म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ३५८

१८२८

REFBK-0003988

REFBK-0003988

सं. ठाणें
काव्य 348

# पद्य-पुष्पहार.

## भाग ३ रा.



सन १९२९.

किंमत १० आणे.

# पद्य-पुष्पहार.

भाग ३ रा.

---

हें पुस्तक


## गजानन गोपाळ जोशी

पेन्शनर स्कूलमास्तर,


यांनीं तयार केलें.

REFBK-0003988

ग्रंथ कर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

सन १९२९.

किंमत १० आणे.

हें पुस्तक **भगवंत देवजी वाजे**, डुबेरकर यांनीं सिन्नर येथें आपल्या **हनुमान** छापखान्यांत छापले व **गजानन गोपाळ जोशी**, यांनीं नाशिक येथें प्रसिद्ध केलें.

# अभिप्राय.

रा. रा. ग. गो. जोशी यांसी कृ. सा. न. वि. वि.

" पद्यपुष्पहार भाग ३ " म्हणून जो आपला काव्य संग्रह प्रसिद्ध करण्याचें आपण योजिलें आहे त्यांत येणाऱ्या कविता मी मोठ्या आनंदानें वाचल्या. आपल्या कविता बहुतेक जुन्या वळणावर आहेत व मी आमच्या जुन्या कवींचा मोठा भक्त व चहाता आहें आपल्या कांहीं कांहीं कविता वाचतांना आपल्या " पंडित " कवींची आठवण होते. भाषा, शब्द, आणि कवित्वस्वेच्छा यां संबंधी व विषयासंबंधींही पुष्कळ साम्य आहे. आपल्या संग्रहानें लोकांचें मनोरंजन व्हावें अशी त्यांत विविधता आहे, सरसताही आहे. मुंडकोपनिषदाचें रूपांतर भाविकांस तसें जिज्ञासूंसही उपयोगी आहे. " ब्रह्मात्म हें ध्येय असें जिवाचें। गा सच्चिदानंद रसाळ वाचें " अशा ओळी मन वेधणारच ! थोर पुरुषांवरील आपल्या कवितांत एक प्रकारची नवीनता आहे. आपली कल्पना पुष्कळ ठिकाणीं उच्च उच्च भराऱ्या मारते, उदाहरणार्थ " दैवी चुंबन " ही कविता " निद्रा आणि गोदा " अशा तऱ्हेची शब्दार्थचमत्कृतिजनक कविता अलीकडे फारशा वाचण्यांत येत नाहींत. आपलें पुस्तक यशस्वी होवो असें इच्छितों कळावें हे वि.

नासिक. — रावबहादुर दा. ग. पाध्ये

ता. २४ सप्टेंबर १९२९ — M. A. J. P.

# प्रस्तावना.

श्री. गजानन गोपाळ जोशी यांच्या कवितेचा तिसरा संग्रह पुस्तकरूपानें प्रसिद्ध होत आहे. सूक्ष्मदृष्टया काव्य आणि जीवन यांचा इतका निकट संबंध आहे कीं, काव्याशिवाय कळत अथवा न कळत कुठल्याच व्यक्तीला जीवनांत सरसता वाटणार नाहीं. साहित्यकार म्हणतात त्या प्रमाणें रस हाच काव्याचा आत्मा आहे. त्याचप्रमाणें रस हाच जीवनाचा आधार आहे इतक्या व्यापक अर्थानेंच कदाचित् प्रस्तुत प्रस्तावना लेखकाचा व काव्याचा संबंध आहे. असें म्हणतां येईल. नाहींतर वाङ्मय प्रांताशीं फक्त परीक्षेच्या निमित्तानेंच ओळख असतांना काव्याच्या कारणीं माझें ज्ञान लागणेंचा प्रसंग यावा हें चमत्कारीक होय.

श्री. जोशी यांच्या प्रसिद्ध झालेल्या मागील दोन भागांवर विद्वान् व रसिक जनांचे अभिप्राय येऊन गेले आहेत. तेव्हां त्यांची वाचकाशीं ओळख करून देण्याचा माझा प्रयत्न आगांतुक ठरेल. प्रस्तुत पुस्तक हें श्री जोशी यांचें वृद्धापकालांतील अपत्य आहे. त्या दृष्टीनें तें त्यांना किती प्रीय असेल हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. श्री. जोशी यांचा मराठीभाषेचा व्यासंग दांडगा आहे. मराठी शाळा मास्तरांच्या धंद्यांत असतांना त्यांनीं मराठी व संस्कृत भाषांचा उत्कृष्ट अभ्यास केला, इतकेंच नव्हे तर

श्री जोशी



इतिहास-संशोधकाचेंही थोडेसें कार्य त्यांनीं केलें. त्याचा भाषाभिमान जितका सक्रिय आहे तितकाच उत्साह त्यांचे ठिकाणीं आहे व त्यामुळेंच प्रस्तुत तिसरा पद्यपुष्पहार सरस्वती चरणीं अर्पण होत आहे.

सकृद्दर्शनीं प्रस्तुत संग्रहाचे दोन विभाग पडतात. पहिल्या विभागांत (१) सृष्टिविषयक (२) स्मृतिविषयक व (३) देवता विषयक असे तीन पोट विभाग कवीनें केलेले आहेत दुसऱ्या विभागांत मुंडकोपनिषदाचें मराठी पद्यमय रूपांतर आहे.

पहिल्या विभागांत एकंदर ३० कविता आहेत. सृष्टि विषयक कवितांत “ दिवाळी ” सारखा प्रसिद्ध विषय आहे. कै० केशवसुतांची दिवाळी या विषयाची कविता प्रसिद्ध आहे. परंतु दोन्ही कवींचा दृष्टि कोन अत्यंत भिन्न आहे. श्री. जोशी यांचा दृष्टीकोन अत्यंत सामान्य आहे. दृश्य परिस्थितीच्या वर्णनापलीकडे श्री. जोशी हे क्वचितच जातात उपमा, अलंकार तुलना वगैरेची धडपड कोठें कोठें दिसत असली तरी श्री. जोशी यांना उत्कटता मानवत नाहीं असें दिसतें सृष्टिविषयक कवितांतून त्या सृष्टीच्या निर्मात्याकडेच श्री. जोशी यांचें लक्ष वारंवार जातें. श्री. जोशी ह्यांच्या कुठल्याही कवितेंत हें चित्स्तवन प्रसन्नपणें केलें जातें जुन्या कवीप्रमाणेंच श्री. जोशी यांना मानवणारा रस म्हणजे भक्तिरसच होय. गायत्री मंत्राचें सुरस विशदीकरण करणारी “ जगन्नियंता ” कविता कवीच्या भक्तिमय अंतःकरणाची साक्ष देते.

स्मृतिविषयक कवितांतून ज्याप्रमाणें कै० लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, इत्यादि राष्ट्रीय पुरुषांच्या समाधींवर पुष्पें वाहिलेलीं दिसतात. त्याच प्रमाणें श्री. यशवंतराव महाराजा सारख्या साधूंचीही स्मृति तितक्याच आदरानें व आस्थेनें पाळिली गेलेली दिसेत. त्यांतल्या त्यांत ' निरंजन माधवस्तवन ' ही कविता चांगल्या प्रकाराची आहे. कवीच्या शब्दसंपत्तीचा हा एक उत्कृष्ट मासला आहे.

वर निर्दिष्ट केल्याप्रमाणें श्री. जोशी यांना मानवणारा रस म्हणजे भक्तिरसच होय. ह्यामुळें ह्यांच्या भक्तिविषयक कविता जशा साधल्या आहेत. तशा इतर दिसत नाहींत. येथें त्यांचा उपनिषदांचा गाढ अभ्यास असतांनाही त्यांच्या अंतः-करणांतील संवेदनाशक्ति तीव्र राहावी हें त्यांना खरोखर कौतु-कास्पद आहे. भक्तिविषयक कवितातून ' निद्रा व गोदा ' ही कविता सुंदर साधली आहे. निद्रा आणि गोदा ह्या दोन्हींतलें साम्य व त्यांच्यांतील विरोध उत्तम रीतीनें दर्शविला गेला आहे. कवींचा कल्पनाविलास या कवितेंत जितका दिसून येतो, तितका इतरत्र क्वचितच आढळतो. यांतील उतारे देण्यापेक्षां सर्वच कविता वाचणें जास्त श्रेयस्कर होईल. कवीची नेहमींची तत्वज्ञानविषयक प्रवृत्ति व श्रद्धायुक्त अंतःकरण हीं येथें सोज्व-ळतेनें दिसून येतात. " गोदास्तुती " ह्या कवितेंतील

" तुझा माय दिव्यौघ वाहो मनांत '
" जिवाच्या कला शांत होवोत आंत "

या ओळी सहज स्फूर्तीचें सुंदर निदर्शन आहेत. पांडुरंगाष्टक व समर्थाष्टक ह्या पूर्व परंपरेची सांखळी चालविणाऱ्या कविता कोणत्याही भक्तिमान् अंतःकरणाला आवडतील अशा आहेत.

कवींची " दैवी चुंबन " ही कविता अनेक दृष्टींनें वाचनीय आहे. कवीनें आपली आध्यात्मिक दृष्टि चुंबनाकडे लावून आधुनिक कवींनीं आचरटपणानें विटाळलेल्या चुंबनाचा उद्धार केला आहे. चुंबनासारख्या विषयाकडे पाहातां ही कवीची दृष्टी आध्यात्मिक विषयापासून चळत नाहीं. हें कित्येकांना दूषणावह वाटत असलें तरी कवीला निःसंदेह भूषणावह आहे कामार्थास नियंत्रित करून वैवाहिक सद्धर्म करणें हेंच " विवाह माधुरींचें " रहस्य आहे.

कांहीं कविता प्रासंगिक आहेत. त्यांचें महत्व अर्थात्च प्रसंगानंतर टिकत नाहीं. तरी पण कवीच्या त्या प्रसंगीच्या भावनांचें सुलभ दिग्दर्शन त्यांतून होतें.

संग्रहांतील दुसरा भाग म्हणजे मुंडकोपनिषदाचें पद्यमय रूपांतर हा होय. उपनिषदें मूळांतच कळण्यास कठीण असें असतांनाही उपनिषदांतील एक एक मंत्र घेऊन त्याचें मराठींत पद्यमय रूपांतर करण्याचा श्री. जोशी यांचा उपक्रम स्तुत्य आहे प्रत्येक मंत्राबद्दल एक श्लोक असें रुपांतर करण्यांत अनेक प्रसंगीं अर्थ हानी होण्याचा संभव बराच असतो. श्री. जोशी ह्यांच्या

रूपांतरांत कांहीं प्रसंग जरी असे असले तरी पण मूळांतील सर्व साधारण अर्थ अत्यंत सुलभतेनें प्राकृत जनांच्या चरणीं त्यांनीं सादर अर्पण केला आहे कांहीं मंत्रांचें रूपांतर तर अत्यंत सुंदर साधलें आहे एकंदरीनें श्री. जोशी यांचा हा प्रयत्न संस्कृत न जाणणाऱ्या वाचकांना निसंदेह फलप्रद होईल, असें वाटतें.

श्री जोशी यांच्या काव्याचें साधारण स्वरूप अशा प्रकारचें आहे. सांग व सोप पत्तिक परीक्षणाचें काम शेवटीं रसिक वाचकांवरच सोंपविणें भाग आहे. प्रस्तावनेच्या नीरस वातावरणांत ह्यापेक्षां अधिक काल कंठण्यास वाचकांप्रमाणें प्रस्तावना लेखकही अत्यंत नाखुष आहे. श्री. जोशी ह्यांनीं माझ्या सारख्या वाङ्मय प्रांतांत अनभ्यस्त माणसाला अशा रीतीनें अंशतः तरी कार्यप्रवण केलें. ह्याबद्दल त्याचे अभार मानून एथेंच प्रस्तावना पुरें करणें बरें !

रविवार पेठ नासिक
२८-७-२९.

**त्र्यंबक गणेश कुळकर्णी.**
M. A. L L: B. वकील.



# अनुक्रमाणिका.


| अनुक्रम | विषय | पान |
|---|---|---|
| | **(१) सृष्टिविषयक** | |
| १ | जगन्नियंता श्लोक. .... | १ |
| २ | दिवाळी श्लोक. .... | ४ |
| ३ | राष्ट्रैक्य परिषद्दीपावली श्लोक. .... | ५ |
| ४ | शिमगा श्लोक. .... | ६ |
| ५ | शिमगा आर्या. .... | ७ |
| ६ | सक्रांतीचा हलवा श्लोक. .... | ८ |
| ७ | सृष्टि--सौंदर्य. श्लोक .... | १० |
| ८ | शिक्षक श्लोक. .... | १२ |
| ९ | भारतीय स्वातंत्र्य सुमन .... | १४ |
| १० | भारतीय वैद्यकसंमेलन. .... | १५ |
| ११ | विवाह माधुरी. .... | १६ |
| १२ | वसंत---व्याख्यानमाला. .... | १८ |
| १३ | दैवी---चुंबन. .... | १९ |
| | **(२) थोर पुरुष--स्मृति.** | |
| १ | स्वामी विवेकानंद. .... | २० |
| २ | लो. टि. यांचा मृत्यु--श्लोक. .... | २१ |
| ३ | लालालजपतराय मृत्यु श्लोक. .... | २३ |
| ४ | श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य (शिवगंगा)यांचे स्वागत..... | २४ |

५ श्रीरामदास स्तुति ( मठ टाकळी. ) .... २६
६ निरंजन माधव स्तवन श्लोक. २८
७ श्रीयशवंतराव महाराज (देवमामलेदार) स्तवन .... २९
८ पंडित हरि शास्त्रीफडके यांचा मृत्यु श्लोक. .... ३१
९ लो० टिळक समाधीला सुमनांजली. .... ३३
१० श्री निवृत्तिनाथस्तवनार्या. .... ४९
११ शिवाजी स्फूर्ति श्लोक. .... ६५

## ( ३ ) देवता स्तुति.

१ निद्रा आणि गोदा. .... ३४
२ श्रीगोदास्तुति श्लोक. .... ३७
३ श्रीपांडुरंग स्तोत्र श्लोक. (अष्टक) .... ४१
४ ,, ,, .... ४३
५ तूंच समर्थ .... ४५
६ श्रीशंकरस्तुति ( महाशिवरात्री निमित्त ) आर्या .... ४६
**मुंडकोपनिषद.** ५१

म. काव्य ८०८

# जगन्नियंता श्लोक.

तत्त्वाचा मंत्र[1] सांगे " प्रसवुनि जगता प्रेरितो जो तयाला ।
तैसे प्रेरी मतीला, भजसि सतत तूं दिव्य नारायणाला " ॥
सांगावें हें मनाला, चरण—कमल तूं आठवी ईश्वराचें ।
ऐकेना तें कधींही, विषय जपतसे, बोलतें तेंच वाचें ॥ १ ॥

असंख्य दिसती नभीं फिरती तारका प्रत्यहीं ।
दिली गति जयास जी, सतत पाळिती नित्यही ॥
जगास जल, तेज दे तपन जो जगत्कारण ।
नभांत फिरतो सदा, फिरवी त्यास नारायण ॥ २ ॥

मनास जरि ताप हो उठति कल्पना क्षोभतें ।
तयास रमवी निशा--पति करें वसे शांत तें ॥
वनस्पति लतादिकां सुरस देउनी पोषितो ।
अशास फिरवी, करी विकल देव त्या ग्रासितो. ॥ ३ ॥

शास्त्रांचे रचिते, किती रमति कीं नाट्यांत काव्यांतरीं ।
कोणा आवडती कला, डुलति ते गाण्यांत वाद्यांतरीं ॥
धर्माचे कारितात अध्ययन ते, हो ऐक्य सर्वांमधें ।
ऐशा भिन्न--मतांतरार्थ विभुनें केलें नरा कां मधें ! ॥ ४ ॥

---

यः नः धियः प्रचोदयात् तत् सवितुः देवस्य वरेण्यं भर्गः धीमहि-जें आमच्या बुद्धीला प्रेरणा करितें असें दिव्य [ जगत् ] प्रसवणाऱ्याचें उत्कृष्ट तेज ध्यातों. ( वर्णानुपूर्वी बदलून )

ससा, हरिण हे पशू असति दीन, व्याघ्रादिक— ।
अनाथ पशुला कसें वधिति; कोण तत्प्रेरक ! ॥
गजाश्व पशु हे जनीं मनुज--संपदा सांगती ।
कशास विभु ही अशी करिति सृष्टि भिन्नाकृती ? ॥ ५ ॥

पक्ष्यांचे असती प्रकार बहु, हा गातो सुरागी पिक ।
नाचे मोर पिसें कशीं पसरितो, तैसेच हंसादिक— ॥
कासारीं रमती, वनीं विहरती गृध्रादि खाती शव ।
सृष्टीला उपयुक्त सर्व असतें, प्रेरी तयाला भव ॥ ६ ॥

किड्यांच्या या जाती विविध असती भूवर किती ।
कसे होती जाती, फिरत असती कार्य करिती ॥
विणी जाळें कोळी बहुत लघु मुंगी श्रम करी ।
अशांनां कौशल्य प्रभुवर कसा दे वद तरी ॥ ७ ॥

समुद्रामधे राहती जीव फार ।
कसे झोंप घेती, कुठें त्यांस थार ॥
कसे श्वास घेतात उच्छ्वास पाहे ।
जिवां जीव खाती, चमत्कार आहे ! ॥ ८ ॥

प्राण्यांच्या सम जो चमत्कृति करी उद्भिज्ज-कोटींतही ।
शेवाळें लघु होय, थोर वड कीं, चाले क्रिया एक ही ॥
आहे बीज अणू परी निघति हीं झाडें कशी त्यांतुनी ।
येई बीज पुन्हा लता-तरुस तें पानां-फुलां मागुनी ॥ ९ ॥

वर्षाकालीं धरणि हिरवी दाविते ईश-लीला ।
जाई, चांपा धवल सुमनें पातलीं केतकीला ॥
तद्‌गंधानें उपवन भरे, भृंग हो लुब्ध, सर्प ।
वेली घाली मिठि तरुवरा शेष हो नांव दर्प ॥ १० ॥

पुष्पांमध्यें सुरस बसतो मक्षिका नेति त्यातें ।
पोळ्यांमध्यें मध भरिति त्या, जाण कौशल्य बा तें ॥
द्राक्षांमध्यें मधुर रस, हीं लिंब, नारिंग गोड ।
आंबे, केळीं अननस फळें, सृष्टिचें पूर्ण कोड ॥ ११ ॥

नभीं वेल वाढे तयालागि पाणी ।
कसा घालितो हा पहा, चक्रपाणी ॥
शिळेमाजि बेडूक राहे सुखानें ।
तयाला तिथे अन्नपाणी कसा ने ! ॥ १२ ॥

असति खनिज कोटी त्यांत ऐश्वर्य बाणे ।
मणि-रजत-सुवर्णा भूमि हें एक ठाणे ॥
उदरिं धरणिच्या गा, द्रव्य कोट्यानुकोटी ।
परि विकृति वसे ती वर्ष जाताहि कोटी ॥ १३ ॥

राजाच्या मुकुटीं जसे विलसती ते कोहिनूरादिक ।
रत्नाला प्रसवे अशास 'वसुधा' हें नाम हो सार्थक ॥
राष्ट्राचे अवशेष भूत असती तद्वैभवा सांगती ।
सांगे भूस्तर जीव कोटिस तसे उद्भिज्ज कोटी, गती ॥ १४ ॥

असे चालवी जो सदा या जगाला ।
नमस्कार माझा असो तत्पदाला ॥
मनानें, तनूनेंहि सृष्टि-स्वरूप— ।
पहा ओळखा सच्चिदानंद रूप ॥ १५ ॥

---

## दिवाळी-श्लोक.

गगन रमवि चित्ता चंद्र-तारा-गणांनीं ।
अवनि रमवि लोकां वृक्ष-वेली-फुलांनीं ॥
कथि रघुपति-लीला सृष्टि-सौभाग्यशाली ।
ऋतु शरद मनाला तोषवी ये दिवाळी ॥ १ ॥

निघति जनक-गेहां जावया कन्यका, हो ।
बहु सुख असतें त्या, मातृ-बंध्वादिकां हो ॥
सतत करुनि कामें शीणली फार काया ।
ह्मणुनि करिति लीला प्रेम—पक्वान्न खाया ॥ २ ॥

सदन बहुत शोभे दीप-रंगावल्यांनीं ।
सजविति शरिराला वस्त्र-सद्भूषणांनीं ॥
करिति धनिक पूजा इंदिरा-शारदांची ।
भगिनि करिति भावा मेजवानी सुखाची ॥ ३ ॥

स्थळ प्रत
म. सं. ग्रं. ठाणे.

अनुभव कथिती ते एकमेकांस फार।
शिकविति गुण, व्हावें योग्य संसार-सार ॥
सुहृद-शिकवणीचें मोल लोकीं न होय ! ।
ह्मणुनि खरि दिवाळी भेटिची योग्य सोय ॥ ४ ॥

जरि करि मनुजाला साह्य सृष्टि प्रभूची ।
मग मनुज करी कीं सौख्य-लीला तनूची ॥
कधिं जरि नच झाला योग्य पर्जन्य काळीं ।
तरिच मनुज-शक्ती ना टिके, अल्प झाली॥ ५ ॥

---

# राष्ट्रैक्य परिषद्दीपावली.

ऐक्याची भरली सभा, तिजमधें जे वीर आमंत्रिले ।
तद्धृन्मंदिर-भावना-भगवती पादांस मीं वंदिलें ॥
ज्यांनीं देह-मनीं सदैव नमिली राष्ट्रोन्नती देवता ।
तत्तेजें हृदयीं प्रकाश पडला, दीपावली भारता ॥ १ ॥

हिंदीस्तान सदा मनांत झुरतो, स्वाराज्य नाहीं तया ।
जाती, धर्म मनांत भेद धरिती, "मक्का" दुजी कीं "गया" ॥
व्यापी सर्व जगास तत्त्व विभुचें "अल्ला" म्हणा "ईश्वर" ।
अर्थानें जगतांत भिन्न नसती, शब्दांवरी कां भर ! ॥ २ ॥

झाले भेद जगांत आज दिसती, आहेत ते भौतिक ।
त्यासाठीं करितात वाद जन हे, ते होत कीं नास्तिक ॥
ऐक्याचा उपदेश सुज्ञ करिती, जाणून तत्त्वास या ।
गावें राष्ट्र मनीं, जनांत, हृदयीं ध्यावें स्वरूपीं तया ॥ ३ ॥

श्रीधर्मात्मे हृदयिं भजतीं सच्चिदानंद मूर्ती ।
राष्ट्राची जी करित असते जाण, गा योग्य पूर्ती ॥
भावें गाई भरत-जननी सोड, बा, व्यर्थ भेद ।
ऐक्याचा हा मधुर सखया, गाय, रे गोड वेद ॥ ४ ॥

ज्या अन्नाचें शरीर बनतें, पोषितें जीव-भाव ।
त्या अन्नाला भरत-धरणी देतसे आत्मभाव ॥
इंद्रप्रस्थीं म्हणुन भजती राष्ट्रमूर्तीसतीस ।
हृत्प्रासादीं सरस करि, रे, ऐक्य दीपावलीस ॥ ५ ॥

---

# शिमगा श्लोक.

होळीचें करितात पूजन जनीं माता भवानी करें ।
देती कुंकु, गुलाल, गंध, सुमनें नैवेद्यही आदरें ॥
रोगातें हरिते प्रसन्न करिते चित्तास चिद्देवता ।
यज्ञाचा दिसतो प्रकार मग त्या कां येइ अश्लीलता ! ॥ १ ॥

वाणीनें अपवित्र शब्द करणें हें गोड कां वाटतें ! ।
पश्वादीक कधीं मुखें म्हणती गा, गुह्येंद्रिया जाणतें ॥
नाचोनी करितात खेळ रमती पक्ष्यादि मादीनर ।
वाचेनें कृतिनें अमंगल असे सांगे मला तूं तर ॥ २ ॥

देवानें दिधला पवित्र असला हा जन्म तुझा नर ।
आला घाल तरीं स्वकीय कृतिला होऊं नको वानर ॥
सांगे कां असलें पुराण म्हणती थोतांड आहे, पहा ।
आत्माराम नसे अशांत; करितें बीभत्स चित्तीं दहा ॥ ३ ॥

वीरांनां समरांत शौर्य चढवी, त्या लावण्या गोड गा ।
आखाड्यांत रमे, शरीर वळतें ओजस्विता तोडगा ॥
रंगाची मग पंचमी रमविते वीरास राष्ट्रांतरीं ।
सांगे हें इतिहास खेळ समरीं होई "मराठा" तरी ॥ ४ ॥

खाई सात्विक गोड अन्न चिवडा शक्तीस नाशी चहा ।
झाला आज जनीं प्रसार सगळा होई न कीं योग्य हा ॥
"योगः कर्मसु कौशलं" कथितसे गीता पहा, आठवी ।
खेळावा शिमगा बलास चढवी राष्ट्रास जो वाढवी ॥ ५ ॥

---

# शिमगा आर्या.

दुर्वासना असति ज्या मिळवुनि गोऱ्या, तयांमधे घाली ॥
दुर्गुण आंगीं दिसतीं तीं आणुनि लांकडें करी होळी ॥ १ ॥

साधूपदेश लावुनि अग्नी मग पेटवी तदा होळी ॥
सज्जन-संगति होउनि वायू तो झडकरी तिला जाळी ॥ २ ॥

दुर्गुण-संचित धन हें सारें नैवेद्य अर्पिला तिजला ॥
सारे जळोत दुर्गुण जागर तरि सर्व रात्र चालविला ॥ ३ ॥

सज्जन माता, पितरें वाढिति बहु धर्म--नीति पक्वान्न ॥
होता विषयामध्यें व्यसनीं जो हा सदैव आसन्न ॥ ४ ॥

ऐशा या शिमग्यानें तरि कळले योग्य तत्त्वसंघात ॥
मग रंग-पंचमीला रंगे मन फार साधु--संगांत ॥ ५ ॥

ऐसा शिमगा करितां सांगा अपशब्द ओष्ट कां घेई !
शिमग्याला जन म्हणती वाईट, परंतु संसृती नेई ॥ ६ ॥

---

## संक्रांतीचा हलवा श्लोक.

**सं**क्रांती रविची नभांत दिसते आहे जरी साजरी ।
पाहे व्यापक त्याहुनी विलसते शक्ती जगीं गोजरी ॥
नाहीं आदि तिला, अनंत असते, नाना प्रकारें नटे ।
नामें, आकृतिनें अनेक दिसते, तत्त्वें न ती पालटे ॥ १ ॥

**क्रां**ती वीर्यवती रणांत करिती योद्धे जीवा अर्पिती— ।
राष्ट्राच्या उदयास; कीर्ति धवला माळा गळां घालिती ॥
नक्षत्रें सुमनें तयांवरि शिरीं दिग्देवता फेकिती ।
तारांच्या चवऱ्या शिरावरी करीं वारी उषा या किती ! ॥ २ ॥

तीर्थांच्या उदकीं नरास, नरकीं टाकी ललाटीं लिही ।
ऐशी कोण जगांत सांग विलसे देवी जगा व्यालि ही ॥
धर्मांचे कथिती विचार असले जाणे न भोळा जन ।
घालीती कवनें सुरम्य सरसी नेत्रामधें अंजन ॥ ३ ॥

चापातें धरुनी युवन्युवतिच्या स्नेह-स्वरूपी नटे ।
शृंगारीं सजते, मनीं विहरते, संकेत नेत्रीं पटे ॥
कामाचे दिसतात खेळ असले लोकांत नानापरी ॥
चित्रें, नाटक, काव्य, नृत्य कथिती संवेदना अंतरी ॥ ४ ॥

हर्षानें द्विज गाति गीत रसिकीं सद्भावना डोलवी ।
पुष्पांचा सुटतो सुवास सुमनीं प्रेमोदधी हालवी ॥
ऐसी कोमलता दिसे क्षणभरी सौंदर्य जातें लया ।
झंझावात सुटे लतादिक गळे दावानळीं जाल या ॥ ५ ॥

लक्ष्मी काय रुसून जाय भरता, भर्त्याकडे धावते ।
"ना विष्णुः पृथिवी-पती" म्हणुनिया राष्ट्रास नालिंगिते ॥
यासाठीं सगळे स्वराज्य वरिती कालीस आराधिती ।
एकीचें बल सार्थ राष्ट्र-कृतिला, अद्वैत कीं जोडिती ॥ ६ ॥

वामांकीं[1] वसवी मुला भरत-भू, काव्यें मुखें गातसे ।
खादीचा कपडा स्वराज्य निवडा, राष्ट्रास पोषीतसे ॥

---

१ कलकत्ता ( बंगाल ) राष्ट्रीय सभा.

माझीं गोंडस लेकरें कर गळां घाला, चला आपण ।
एकीच्या सुमनांस गुंफुनि हृदीं 'स्वातंत्र्य' लावा पण ॥ ७ ॥

द्यावीं गोड फळें स्वराज्य-जननी-पादांबुजां वंदन ।
चिद्देवी नटते विलास करिते, सारे तिचे नंदन ॥
हृत्पात्रीं खुलवा विचार हलवा स्नेहामधें कालवा ।
गातो गीत कवी, निसर्ग रमवी संक्रांतिचा हालवा ॥ ८ ॥

---

## सृष्टि-सौंदर्य श्लोक.

तेजोनिधी रविशशि ग्रह--तारकादी— ।
प्रेमें नभीं करिति नृत्य पहा, अनादी; ॥
विद्युल्लता तळपते घन--मंडलांत ।
ज्ञानें चमत्कृति अशा जगिं भासतात ॥ १ ॥

गंगा--प्रवाह निघती गिरि--कंदरांत ।
पक्षी किती करिति गायन सुस्वरांत ॥
कासार--पंकज--सुगंध मनो--विहारी ।
ज्ञानें चमत्कृति अशा दिसतात भारी ॥ २ ॥

घेवोनिया मधुर सोज्वल नीर पोटीं ।
गाती नद्या उदधिला मिळतात कोटी ॥

वायू घनांस शिरिं घेउनिया वहातो ।
ज्ञानें चमत्कृति अशा जगिं सुज्ञ पाहतो ॥ ३ ॥

आकाश--मंडलिं पहा, घन रंगतात ।
रूपें विचित्र धरिती नट नाचतात ॥
धारा-जलें वसुमती कशि रंगवीती ।
ज्ञानें चमत्कृति अशा कवि नित्य गाती ॥ ४ ॥

उद्यान-वृक्ष-लतिका सुमनें विलासे ।
प्राज्ञांतरा रमवि काव्य-रसें विकासे ॥
गाते पहा, द्विज-मुखें मधुर-स्वरानें ।
सांगे चमत्कृति जनां कवि आदरानें ॥ ५ ॥

कार्पास-वस्त्र विणिती गिरण्यांत भूतें ।
सौदामिनी क्षणभरांत निरोप नेते ॥
आकाश-यान फिरतें क्रमितें नभाला ।
ज्ञानें चमत्कृति अशा दिसती जनाला ॥ ६ ॥

शस्त्रास्त्र नाश करिती कितिका जिवांचा ।
हें क्रौर्य, शौर्य अथवा धरि मौन वाचा ! ॥
यूरोप-खंड करितो जगिं राज्य आज ।
ज्ञानें जगीं घडतसे, वद काय काज ! ॥ ७ ॥

भाषा जुन्या कथिति वैभव सज्जनांचें ।
क्रांती कशी घडतसे वदतात वाचें ॥

सृष्टी अशी कारितसे जगतांत कार्य ।
शास्त्रें जनांस कथिती नियमाऽनिवार्य ॥ ८ ॥

प्राचीन संस्कृति, तशी अधुनैक होवो ।
देशाभिमान हृदयीं स्थल नित्य देवो ॥
पृथ्वीमधें भरतखंड सुविद्य होवो ।
शास्त्रें, कला, विमल-कीर्ति जनांस दावो ॥ ९ ॥

ज्ञान-प्रवाह-सरिता भरतांत वाहो ।
स्नानें तिथें करुनिया जन शुद्ध होवो ॥
राष्ट्रामधें करिति सुंदर पाठशाला—
कार्यें अशीं भरत-खंड-सुसंस्कृतीला ॥ १० ॥

---

## शिक्षक श्लोक.

नीतीचा निघतो प्रवाह जिथुनी देवादिकां लाजवी ।
साधूचीं हृदयें रसाळ वचनें स्नेहें मुला दाखवी ॥
ज्ञानेशादिक, बौद्ध, यावन पहा, तत्त्वामधे रंगले ।
होते धर्म-गुरू अनेक जगतीं त्यांनीं खरें जाणले ॥ १ ॥

ज्यांनीं देह रणीं सदा झिजविला देशांचिये कारणें ।
सौख्याला जल सोडुनी सुतधनां, जी पाशवी कारणें ॥
लक्ष्मी त्यास वरी परि त्यजुनिया दासीपरी वागवी ।
त्यांची थोर कृती मुलांस शिकवी, शौर्यादिकां जागवी ! ॥ २ ॥

संघातें धरुनी स्वराज्य करिती आंग्लादि, राष्ट्रांवर ।
व्यापारादिक सर्व कार्य करिती, सर्वांमधे ते वर ॥
शक्ती भौतिक साधुनी दिपविलें साऱ्या जनाला पहा ।
आहे 'संहति कार्यसाधक' जगीं दावी गुरु योग्य हा ॥ ३ ॥

सृष्टीची रचना सुरेख दिसते वृक्षादि—पक्ष्यादिक ।
पुष्पें सुंदर गंध-युक्त फुलती चित्तास ते मोहक ॥
येती गोड फळें रसाळ दिसती, जीवांस तीं पोषिती ।
सृष्टि क्रांति अशी करीत असते, हें कोण गा दाविती ॥ ४ ॥

जेथें थोर नद्या जलास धरुनी जाती समुद्राकडे ।
देशाला धन देत, घेत निघती जें पर्वतीं सांपडे ॥
नेई तज्जल मेघ हा गिरिवरी अब्धींतुनी तें पुन्हां ।
सृष्टी ही फिरत्री रहाट असला तूं शांत-चित्तें पहा ॥ ५ ॥

तारे हें फिरती नभांत नियमें लक्षावधी अंतरीं ।
तेजःपुंज तसे विचित्र असती तूं शोध गा, अंतरीं ॥
जेथें मानव-शक्ति ही अणुपरी वाटे तुला काय रे ।
सृष्टीची रचना अगाध दिसते ध्यावी न ती कां बरें ! ॥ ६ ॥

गावें स्नेह-रसें कवित्व कविचें वृत्ती कधी मानवी ।
कामाला भुलते सुखांत डुलते, मोहास जीं पालवी ॥
चित्ताची विकृती कृतींत दिसते जी नाटकाभीतरीं ।
सांगे हे कवि दृश्य-रूप सगळें, संतोष दे अंतरीं ॥ ७ ॥

आहे शिक्षक जो खरा समजुनी देई मुलाला तरीं ।
आस्थापूर्वक जो मनांत असतो, विद्यार्थी घे अंतरीं ॥
नातें हें असतें परस्पर असें दोहींकडे लागतें ।
कर्ता, कारण जोड हे असति वा, सृष्टीमधें वागते ॥ ८ ॥

---

# भारतीय स्वातंत्र्य सुमन.

सिंधू हिंदू म्हणुनी गौरविती आर्यभूस नामानें ।
कोपानें चढली कां ! झालें संतप्त हृदय घामा ने ॥ १ ॥

कां इंद्रदेव वरुनी करिती अभिषेक शीर्ष शमवाया ।
धावे ब्रह्मसुता ही पूर्वाभिमुखा फुगे तनू वाया ॥ २ ॥

त्वत्पद- कमला--वरती सिंची जल मेघराज वरुणाचे ।
झाला दाह शरीरीं; तुटले कीं दोर काय अरुणाचे॥ ३ ॥

भारत-भू-मातेला दुःख असें होय, सांग तें काय !
आपाद-मस्तकवरी कीं संपप्त जाण हा काय ॥ ४ ॥

पांचाल--हृत्प्रदेशीं इंद्रप्रस्थीं जडे महा-रोग ।
जमले डॉक्टर, वैद्यहि पाहति अद्यापि ना सरे भोग॥ ५ ॥

लालाजी होमियले जितेंद्रदासहि बुभुक्षिते गेले ।
देहाला अर्पियले राष्ट्रोन्नति--देवता--पदीं ठेले ॥ ६ ॥

[library stamp]

भारत-भू-सुत-हृदयीं भडके ज्वाला धडाडुनी आतां ।
प्राणांची देती ते आहुति रवि-मंडलास कीं गातां ॥ ७ ॥

स्वातंत्र्य-दीप विझला, लाविति चिद्दिव्य अर्पुनी देह ।
प्राणाहुतीस देती, आहे कीं क्षत्रियास हें गेह ॥ ८ ॥

दैवी-क्षोभ असा हा भारत-भू-हृदय-काय कीं उलते ।
मानव-शोक-समुद्रीं भरती रवि-मंडलास कीं भिडते ॥ ९ ॥

शोकाचे मोहांचे तरंग राष्ट्रांतरांतले झोके ।
स्वातंत्र्य-दीप लाविति वीर-पुरुष, दूर मानवी-शोकें ॥ १० ॥

जतींद्रानें केलें हवन तनुचें राष्ट्र-भुवनीं ।
भरे इंद्र-प्रस्थीं परिषद वरी द्रव्य हवनीं ॥
असे अध्वर्यू गा, तिलक भरत-स्नेह-सारिता ।
वरा स्वातंत्र्याचें सुमन-फल हें कार्य कारिता ॥ ११ ॥

---

# भारतीय वैद्यकसंमेलन.

वैद्यांनों, भरली सभा तिजमधें व्याख्यान आरंभिलें ।
आयुर्वेद-कथा-विचार कथिले, प्राचीन ते जाहले ॥
मात्रा दाखवितां अनेक रस हे, नानापरी औषधें ।
शास्त्रें भौतिक-संस्कृतीस टिकती ऐसें करा त्यामधें ॥ १ ॥

सांगे डॉक्टर पथ्य, हें न कथितो हा वैद्य; कां हो असें!
दोघांचे दिसती विचार असले, ना मेळ ज्यांचा वसे ॥
त्याचा कारण--कार्य–भाव जुळवा, साहित्य तें वाढवा ।
हें पाश्चात्य-सुसंस्कृतींत रुजवा, संमेलनीं सोडवा ॥ २ ॥

कालाचा परिणाम काय दिसतो! राष्ट्रौघ हा वाहतो ।
साध्यें साधन त्यावरील जुळवा प्राचीन न त्यागि तो ॥
सोडा आग्रह, योग्य तेंच निवडा जोडा स्वयें आदरें ।
शास्त्रें भौतिक–संस्कृतीस टिकवा, संमेलनीं हें बरें ॥ ३ ॥

तत्त्वें सुश्रुतवाग्भटांत कथिलीं हृन्मंदिरीं शोधिलीं ।
तेजस्वी मुनिंनीं जनास दिधलीं सत्पात्रिं कीं वाढली ॥
त्वद्धस्तीं पडली मतींत रुजलीं सद्भावना वाढवी ।
ती पाश्चात्य-सुसंस्कृतीस जडवी, सद्धेतुनीं डोलवी ॥ ४ ॥

आयुर्वेद-लता नृपाल-सदनीं फोफावली वाढली ।
गेली काय पहा! सुकून सगळी पाश्चात्य-कोलाहलीं ॥
घ्या लोकाश्रय काल हाच बघुनी स्वाराज्य हें आदरें ।
न्या पाश्चात्य संस्कृतींत तिजला वंदीं तुम्ही मी करें ॥ ५ ॥

## विवाह माधुरी.

आहे बंधन सौख्यदायक तुला, हे चालले सोहळे ।
सृष्टीचा क्रम काम मूल दिसतो, तारुण्य हो आगळे ॥

येई भार परी शिरावरि वसे राष्ट्रोन्नतीदेवता— ।
दांपत्यें रमता समाज-शिखरीं स्नेहार्द्र हो क्रीडता ॥ १ ॥

स्नेहाच्या सरितोद्गमांत करितां स्नानें मनें रंगती ।
प्रेमोद्यान--लता सुरम्य फुलतां बाळें फुलें डोलती ॥
गुंफी हार सुरेख सुंदर गुणीं हृद्भावना-मंजरी ।
सौगंधें नटते विलास--रमणी स्वर्गांगना सुंदरी ॥ २ ॥

होते तेज पहा, जिजाइ--उदरीं स्वाराज्य तें स्थापिलें ।
ज्ञानेशादिक–साधु-तेज झळके प्राज्ञांतरीं पाजळे ॥
राष्ट्रोद्धार-पवित्र-भाव हृदयीं या बंधनीं आगळा ।
कामाच्या कुसुमीं रमेल मन कीं तन्मोह कापी गळा॥ ३ ॥

बीज-क्षेत्र-गुणें लतेस सुमनें येती दिशा व्यापिती ।
वैशिष्ट्यें फलरूप–कार्य करिती स्वादें मनें गुंगती ॥
लोकांच्या हृदयांतरांत शिरती कार्यें जना दाविती ।
त्यागानें मग "लोकमान्य" दिसती ही बंधनें जाणती॥ ४ ॥

दांपत्यें हृदिं भाव सोज्वल असें, तारा प्रकाशे नभीं ।
तेजोरूप दिसे, जरी प्रकृतिनें हो मानवी, हृन्नभीं ॥
कामार्थास मनीं नियंत्रित करी सद्धर्म वैवाहिक ।
घ्यावीं गोड फळें विवाह-तरुचीं शोधोनि हीं ऐहिक ॥ ५ ॥

# वसंत-व्याख्यानमाला.

सृष्टींचा नृपती वसंत म्हणती संवेदना खेळती ।
जातीं चंपक मोगरा वधुवरा माळा गळां घालिती ॥
गाणें कोकिल गा, निसर्ग रमणी आंदोलनीं खेळते ।
सत्काव्यप्रतिभा जगांत नटते, वासंतिका बोलते ॥ १ ॥

ऐसा काल पहा, सुखांत असतां, व्याख्यान-माला-रवी ।
राष्ट्राची सरसी सुगंध सुमनें प्रेमोत्सवें डोलवी ॥
सांगे धर्म-कथा, रसाळ कविता स्वाराज्यचंद्रोदय ।
एकीच्या उदधीस पूर्ण भरती आणीतसे चिन्मय ॥ २ ॥

जाती मत्सर, भेद सर्व पळती स्नेहामधें डोलती ।
ज्ञानाची किरणें मनास हरिती हृत्पंकजीं रांगती ॥
नाहीं स्त्रीपुरुषांत भेद कसला गंगाजळें सागर ।
मालेचीं सुमनें सुगंध सरशी सूत्रांमधें सुंदर ॥ ३ ॥

विद्वत्ता रसिकांतरांत रुजली पाळेंमुळें खेचिलीं ।
राष्ट्रोद्धार फुलें सुरम्य फुललीं मालेंत कीं गोविलीं ॥
वासें गुंग कृतींत दंग दिसती सारे पहा सज्जन ।
गुंफावीं सुमनें सुगंध सरशीं कार्योत्सवीं मज्जन ॥ ४ ॥

हिंदीस्थान मुखीं मनांत हृदयीं रात्रंदिनीं सोहळा ।
स्वातंत्र्योज्वल दीप होय सरसा कार्योन्मुखी पाजळा ॥

ध्यावीं गोड फळें रसाळ तरुचीं स्नेहोदका घालुनी ।
या पौर्वात्यसुसंस्कृतीस उजळी पाश्चात्य हें शोधुनी ॥ ५ ॥

ग्रंथ संग्रहालय ... आ. के.

## दैवी-चुंबन.

घेतो चुंबन नित्य नेम करुनी ज्ञानेश्वरी गायन ।
हृज्ज्योति—प्रतिभा विलास करिते आनंद चिन्नंदन ॥
गाती गोड मुखें, सुखें विहरती, नानापरी रंगती ।
दैवी चुंबन हीं फळें मधुर या प्रेमांगणीं चोखिती ॥ १ ॥

गातो आंग्ल—कवी रसाळ कविता घेतो तिचें चुंबन ।
नेमानें रमतो विलास करितो संवेदनालिंगन ॥
देतां, तेज कसें हृदीं उजळतें सद्दीपनीरांजन ।
प्रीतीचीं सुमनें, सुपक्व सुफलें हीं मानवी व्यंजन ॥ २ ॥

येतां सूर्य नभीं जगास खुलवी देती तया चुंबनें ।
ऐसें काय जगांत सांग दिसतें ज्याला न चित्स्पंदन ॥
गातीं प्रेमभरें रसाळ वचनें पक्षी मुदें नाचतीं ।
तारापुंज, लपे उषा कमलिनी अंतःपटीं वाचिती ॥ ३ ॥

गेले वीर पराक्रमी हरपले वाजे यशोदुंदुभी ।
ज्यांची कीर्ति लता सुरम्य फुलली ओवाळण्याला उभी ॥
ज्यांचें तेज नभांत दिव्य खुललें हा मार्ग शोधी जन ।
घेती चुंबन नित्य थोर महिमा नेत्रांमधें अंजन ॥ ४ ॥

घेते चुंबन हिंद--भू--जननी गा, स्वातंत्र्य--सूर्योदयीं ।
हृत्पद्मे फुलती द्विरेफ रमती स्नेहांगणीं चिन्मयी ॥
सृष्टि स्पंदन " चुंबनें " म्हणति हीं आकर्षणें सुंदर ।
शास्त्रें, काव्य, कला, विहार सगळे शक्ति-स्वरूपांतर,॥ ५ ॥

---

## ( २ ) थोर पुरुष--स्मृति.

# स्वामी विवेकानंद.

धर्माचा रवि जो जगीं उगवला अस्तास गेला कसा ।
वेदांतामृत पाजिलें ह्मणुनि हो ख्रिस्ती-जनां लालसा ॥
योगाचा त्रय उद्धरी बहु जनां, बिंबे जया अंतरीं ।
केली निष्ठुरता प्रभो, कशितरी नेली भवाब्धितरी ॥ १ ॥

धर्माला अमच्या जगांत पहिली जागा असे स्पष्ट ती- ।
ज्यांनीं सिद्ध जगीं करून दिधलें, ते धन्य हो बोलती ॥
स्वातंत्र्यां भजतात, तेच नमिती देवांश येशूहुनी ।
मी वंदीं चरणीं कसें त्यजियलें! दुर्दैव ये ओढुनी ॥ २ ॥

विद्युन्मानस-शास्त्र फार तुमचें चित्तास संतोष दे ।
वेदांताब्धिस कोण पूर्ण भरती पूर्णेंदु आणी वदे ॥
काळाला इतक्यामधें कशि तुम्ही भेटी दिली आपली ।
नंदाला हरि तो तशीच सुख दे वाणी रसें व्यापली॥ ३ ॥

दंडावा यम हा दिसे तप तुझें, आतां कसें सोडिलें ।
नम्रत्वें कथिलीं मतें स्वपर हीं कोणा नरें पाडिलें ॥
माया ही हरिते जगा, भुलविते सोडी प्रभूला धरा ।
मित्राच्या परि सांगती बहु जनीं, गेला कसा आसरा ॥ ४ ॥

---

## लो० टिळक यांचा मृत्यु-श्लोक.

गेला, गेला हिंद--भू--प्राण गेला ।
नेला, नेला राष्ट्र--चिद्देव नेला ॥
दुर्दैवानें घातली ती कुऱ्हाड ।
स्वातंत्र्याचें वाढतें होय झाड ॥ १ ॥

राष्ट्रासाठीं तनु-मन-धन त्यागिलें लोकपाळा ।
पुण्या भूमी भरत-जननी-मानसाचा जिव्हाळा ॥
हृद्देशीं वा, वसति करिते चिन्मया देश-माता ।
गेला कैसा त्यजुनि तिजला वाटतें शून्य आतां ॥ २ ॥

जिव्हाग्रीं धृति-शारदा विलसते, ओजस्विता निर्मला ।
वेदाचें स्थल शोधिलें बुध-जनीं धन्या मती गाइला ॥
गीता-मंथन सूक्ष्म-बुद्धि रविनें केलें तुवां बालका ।
कर्माचें नवनीत काढुन दिलें स्वातंत्र्य-कार्यास कां ॥ ३ ॥

वर्षें सहा तुजासि मंडल-वास झाला--- ।
कारागृहांत टिळका, मुनि- काल आला ॥

३८८

ऐशा स्थितींत कथिली तरि कर्म-चिंता ।
गातात लोक सरसा मधु धैर्य--गीता ॥ ४ ॥

तुझी मृत्यु–वार्ता जनां थोर चिंता ।
वदे ना मुखें नाठवे देह–वार्ता ॥
कसा बाळ नेला ! किती दुष्ट काळ ।
अशा या विचारें मना हो विटाळ ॥ ५ ॥

अशौचें पहा, आर्य–भूमी विटाळे ।
जनाच्या विलापें बसे कानटाळे ॥
मती कुंठिता जाहली आज काय ।
जिवा मोकलोनी रडे धाय धाय ! ॥ ६ ॥

किती पातलीं बालकाला किटाळें ।
परी शुद्ध--वृत्ती न केव्हां विटाळे ॥
प्रजाराजपक्षें तुला गांजियेलें ।
परी चित्त बाळा, सदा शांत ठेलें ॥ ७ ॥

वसे बुद्धि-नीति-क्षमा-धैर्य-शांती ।
तशी राष्ट्र--संवेदना तत्त्ववृत्ती ॥
अशा सद्गुणांचें खरें संन्निधान ।
कुठें आज नेलें यमा मूर्तिमान ॥ ८ ॥

देवो शांती प्रभुवर तुह्मा स्वर्गसौख्यास देवो ।
राहो लोकीं गुण-गण तुझे राष्ट्र-मातेस सेवो ॥

नं. २३

देशासाठीं जन-मन वळो भिन्नता-भाव जावो ।
त्वत्कीर्तीचा परिमल जनां जागवो प्रेम भावो ॥ ९ ॥

---

# लालालजपतराय मृत्यु श्लोक.

राष्ट्राच्या हृदयांतला हरपला हा लाल गेला कसा ।
वाटे कीं भरतात्म-सूर्य लपला, अंधार झाला तसा ॥
हिंद-स्त्री-मुख भूषणावर, शिरो-रत्नावलीचा, पहा ।
गेला लाल ललामभूत गळला, हिंदीस कीं शाप हा॥ १ ॥

स्वर्गाची भरली सभा तिजमधें अध्यक्ष कां नेमिलें !
बाळानें तुजला त्वरें करुनिया कार्यास बोलाविलें ॥
श्रद्धानंद-मुनी सुनीत-सुमनें पाचारितो वाटतें ।
गेला धावत काय आर्त-हृदयें गांठावया वाट ते ॥ २ ॥

सार्जंटानें अणुनि दिधला मार-संदेश हातीं ।
यावें स्वर्गीं टिळक ह्मणती, वाट सारे पहाती ॥
स्वातंत्र्याची सुकृति--घटना दिव्य देहें घडावी ।
गेला कां हो झडकरि, तरी हिंदभू कां रडावी ! ॥ ३ ॥

स्वराज्य मिळवावया धरिति दिव्य--देहास रे ।
कधीं नर-तनूस हें सहज-- कार्य गा, आवरे ॥

मनांत धरितो जन, प्रभु--मनीं असे वेगळे ।
विमान तरि पातलें, मनुज--देह येथें गळे ॥ ४ ॥

किती क्रांती झाली, मनुज--हृदया काय न कळे !
स्वराज्याचें नाम--स्मरण करितां द्रोह उसळे !
अशी दिव्या शक्ती करित असतें कार्य सगळें ।
तिला वंदावें गा, खचित तुमचा लाल न गळे ! ॥ ५ ॥

---

## श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य (शिवगंगा) यांचे स्वागत.

### आर्या, (गीती)

श्रीमज्जगद्गुरु--प्रभु शिवगंगेचे मठाधिपस्वामी-- ।
आषाढ वद्य दशमी आले गोदा--रघूत्तम--ग्रामी ॥ १ ॥

झाला सुकाल तद्दिनीं आनंद न माय पोटिं लोकांच्या ।
जन्माचें सार्थक हें झालें हो, भाव हा मनीं ज्यांच्या ॥ २ ॥

गेले जन सामोरे योजन, पूजा करोन आणियलें ।
झाला वर्षाव पथीं पुष्पांचा, भक्तिनें तयां पुजिलें ॥ ३ ॥

शृंगारिलें नगर हें कदली--स्तंभादिकें किती पाहे ।
हें सारें वर्णाया माझी किति अल्प लेखणी वाहे ॥ ४ ॥

व्हावा उपदेश अशी आशा आहे मनांत कीं फार ।
होईल पूर्ण, वाटे रुग्णासी काय ती अमृत--धार ॥ ५ ॥

होते अनेक वादी चार्वाकादिक, तयांस खंडियलें ।
केलें प्रस्थान-त्रय, मति-वैभव ज्यांत पूर्ण गा भरलें ॥ ६ ॥

एक ह्मणती 'तनु' आत्मा, 'मन' बुद्धी कीं अनेक हे वदती ।
सुखदु:खादिक सारे आत्म्याचे धर्म न्यायि ते ह्मणती ॥ ७ ॥

सांख्य वदे प्रकृति पुरुष अनादि, देती तयास आधार ।
'प्रकृतिं' पुरुषं चैव स्मृति श्रतीत्यादि घेउनी सार ॥ ८ ॥

बौद्धांनीं व्यापियलें भारत--देशास, हो स्थिती ऐशी ।
अवतरले महीवरती श्रीमच्छंकर तईंच या देशीं ॥ ९ ॥

श्रुति युक्त्यनुभव यांनीं पूर्ण मतें स्थापिलीं पहा, ज्यांनीं ।
त्या श्रीमद्गुरुच्या पदिं लीन असावें सदैव जीवांनीं ॥ १० ॥

परिणाम वाद तैसा खंडिति आरंभवाद तत्त्वानें ।
स्थापिति विवर्तवादा, ज्ञाल्याची कुंठते मती ज्यानें ॥ ११ ॥

जागृत्स्वप्न-सुषुप्तीं प्रत्येकीं जीव हा करी काय ! ।
पिंडीं कार्ये पाहुनि ब्रह्मांडाचा ठरविति कीं काय ॥ १२ ॥

हे पंच-कोश शोधोनि आत्म्याचें शुद्ध रूप गा, वदती ।
भिन्नार्थ श्रुतिची ते सामर्थ्यें लाविती कशी सुगती ॥ १३ ॥

या ब्रह्मसूत्रभाष्यीं सोडविलें प्रश्न युक्तिनें फार ।
ऐशा सद्गुरु--चरणीं मी साष्टांगें करीं नमस्कार ॥ १४ ॥

जें ब्राह्म–तेज झाकीं क्षात्रादिक सर्व तेज त्या काळीं ।
होते मुनिवर-सत्तम, आतां नुसती कथा जनां झाली !॥ १५ ॥

तेजस्वी भूपाला सद्गुरुवांचुनि मिळे न जय युद्धीं ।
मिळविति आशीर्वादा, शुद्ध करोनीच आपली बुद्धी॥ १६ ॥

तें बुद्धि-वैभव किती, अल्पमती मी कसेच वर्णावें ! ।
ज्या पाश्चिमात्य पाहति तत्त्वज्ञहि, लीन होति ते भावें॥ १७ ॥

मंडणमिश्रा जिंकुनि अद्वैत स्थापिलें पहा, लोकीं ।
साक्षाच्छंकर असती त्यांच्या पीठावरील अवलोकीं ॥ १८ ॥

चारी दिशेस ज्यांनीं स्थापुनि मठ चार धर्म वाढविला ।
त्यांची एकचि शाखा शिवगंगा चरण-लाभ हा घडला॥ १९ ॥

ते वास दोन महिने येथें करतील दे जनां लाभ ।
धर्माचे प्रश्न सुटति प्रत्यहि वंदिति पवित्र तो सांभ ॥ २० ॥

---

## श्रीरामदास स्तुति. (मठ टाकळी.)

---

श्रीरामदास--चरणीं ठेवुनि माथा करीतसे स्तवन ।
द्वादश वर्षे केलें गायत्रीचें इथें पुरश्चरण ॥ १ ॥

तो गांव नांव ज्याचें टाकळि मठ, नंदिनी नदी जवळ ।
श्रीमन्मारुति जाळी पापें दर्शन घडे हृदीं निवळ ॥ २ ॥

तें नाशकाहुनी स्थल आहे, हो, कोस एक एकांत ।
त्याचें दर्शन घेतां होईना चित्त काय हो शांत ॥ ३ ॥

जाउनि गोदेवरती सुतपश्चर्या जलामधें केली ।
पाहुनि शुद्धा निष्ठा हृदयांतिल पाप–राक्षसी मेली ॥ ४ ॥

होय अनुग्रह पुढती मग केली हो, अनेक ही कविता ।
जन-हृदय-तमासी जी नाशाया येइ काय कीं सविता ॥ ५ ॥

करुनी शिवावरि कृपा स्थापाया राज्य सुमति त्या देई ।
धर्मादि सर्व कार्यें त्यांच्या हातांतुनी कशी नेई ॥ ६ ॥

मारुति उपास्य दैवत, गायत्री मंत्र, पाप हें जाळी ।
होउनि अंतर निर्मल, सिद्धी ही दास होउनी आली॥ ७ ॥

सोडुनि विषयांतें गा, परेश-पद-सेवनीं सदा जागा ।
येते अद्भुत-शक्ती आहे हो, फार कठिण ही जागा ॥ ८ ॥

गोदेवरती जातां वाटेंत करी सती पतिसगमन ।
आशीर्वादें केला जिवंत पति, जइ करी सती नमन ॥ ९ ॥

दशपुत्र नांव त्यांचें वस्ती हे नाशकास हो, करिती ।
वाणीमध्यें शक्ती तपाविण कशी अशी पहा, वसती॥ १० ॥

आत्म-ज्ञान मिळविती परि लाविति राज-कारणीं देह ।
त्यांच्या ग्रंथीं करिती सुबुद्धि जन हे अतीव सुस्नेह॥ ११ ॥

तुकयादि साधु रमती आत्म-विचारीं दुजें न ते कथिती ।
श्रीरामदासिं अधिकहि, ते राज्य-विचार मानसीं करिती॥ १२ ॥

त्यासाठीं ग्रंथ पढा त्यांचे, ऐसे किती जनां वदती ।
देशोद्धार कराया सुमतीची परि मनीं असो वसती ॥ १३ ॥

ऐसें सत्पुरुष-स्थल पाहुनि आठवति थोर उपकार ।
आहे सदैव त्यांचा "वसुधैव कुटुंबकं" न संसार॥ १४ ॥

दर्शन घेतां मानसिं विचार येती तसेंच सांगतसे ।
न्यूनाधिक्य असावें, क्षमा करावी, दुजें न मागतसे॥ १५ ॥

---

# निरंजन माधव स्तवन श्लोक.

निरंजन-पदांबुजा नमन हें करें आदरें ।
पवित्र-मति-मानसीं सरस भावना पाझरे ॥
उपास्य-विभु-देवता-पद भजे समाधीमधे ।
नमस्कृति तया करी, हर-हरी निमाले मधे ॥ ० ॥

नवा-मनु, जुना मनु-स्मृति करूं नका कायदा ।
सदाख्य-पद-मंदिरीं कधीं नसे असा वायदा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ........

त्रिकाल-परिछेद हा प्रभु-वरा कसा साधितो ।
निरंजन न रंजतो विधि-पदांत, त्या बाधितो ॥ २ ॥

समाधि-सुख साधितां जग जयापुढें किंकर ।
निशा न उरते नभीं उदय पावतां भास्कर ॥
प्रभा हृदयिं पाजळे, स्वपर-भावना गा, जळे ।
जळांत जळ सावळे, विषय-वासना मावळे ॥ ३ ॥

धरा अधर हालवी, तरु-लतांस जो पालवी ।
सुगंध रस कालवी; पिक-शुकांस जो बोलवी ॥
विधी, विधु रवी, कवीश्वर सदाख्यता पावले ।
निरंजन-निरांजनीं सघृत-वर्तिके लावले ॥ ४ ॥

उभी हृदय-मंदिरीं कमल-देवता सुंदरी ।
उपेस करिं आवरी रवि-शशीस दिव्यांबरी ॥
तुरीय-पद सावरी, त्रिपद शोधितां बावरी ।
निरंजन-पदांवरी, भव-समुद्र नौकावरी ॥ ५ ॥

---

# श्रीयशवंतराव महाराज (देव मामलेदार) स्तवन.

श्रीमद्यशवंताच्या पद-कमलीं मी करोनिया नमन ।
करितों यथामती हें स्तवन, रतो संत-चरणिं कां न मन ! ॥ १ ॥

भूम्यादि बाह्य तत्त्वां, शोधिति तैसेंच आत्म-तत्त्वांतें ।
रमती ब्रह्मपदीं जे, तत्सम पाहतिच सर्व सत्वांतें ॥ २ ॥

चित्तानें चिंता ही केली नाहीं कधींच विषयाची ।
मिळतां सुधा जयातें सांगा हो, कोण कुशल विष याची॥ ३ ॥

चिंतन-कार्य पळालें, कारण निद्रा तिथें कशी राहे ।
जागृत्स्वप्नें कार्यें, सुषुप्ति कारण, कसें मनीं पाहे ॥ ४ ॥

निद्रा आली नाहीं श्रीयशवंता कदापि आलोकी ।
कारण नसतां कार्यें होती सांगा, कधीं न या लोकीं ॥ ५ ॥

'मन एव मनुष्याणां' इत्यादी वाक्य सांगतें काय ! ।
मन कारण बंधासी, समूळ नाशी तरीच मृतिकाय ॥ ६ ॥

रमती तुरीय-पादीं, 'अनिद्र' लक्षण असें श्रुती सांगे ।
श्रीमद्यशवंताच्या चरणीं साष्टांग वंदुनी लागे ॥ ७ ॥

अन्नप्राणमयादी पांचा कोशांस सोडुनी गेले ।
रमती ब्रह्म-पदीं ते, यत्सुखदुःखादि सर्वही मेले ॥ ८ ॥

अधिकार चालवोनी दीनावरती सदा दया ठेवी ।
जनक-नृपापरि मिळवी दुर्लभ जी सच्चिदात्म-सुख ठेवी ॥ ९ ॥

आहे प्रसिद्ध ज्याचें नांव जगीं देव-मामलेदार ।
संसारीं राहुनिया उघाडिति तैसेंच मुक्तिचें दार ॥ १० ॥

नाहीं जप-तप केलें, तसें अरण्यांत नाहिं हो, गेले ।
शास्त्राध्ययनहि नाहीं, कैसें सार्थक्य आपलें केलें ॥ ११ ॥

शम-दम दास तयाचे, अगणित पीडा जरी तया झाली ।
परमेश्वरचरणाविण अन्य कथा मानसीं नसे आली ॥ १२ ॥

सच्चरित-सुधारस हा गोड, तया सेवितां न कंटाळा ।
करिती सदैव भजना सद्भक्त करांत घेउनी टाळा ॥ १३ ॥

जग हें मिथ्या आहे, सांगाया वाटतें जरी सोपें ।
विषयासंगें रमतें मन, सततहि, त्यास सोडितां कोपे ॥ १४ ॥

पाहुनि विषया धावे मन हें, संस्कार होति बा, जागे ।
ईश्वर-भजनें जाळी संस्कारा, सत्पदांत तो जागे ॥ १५ ॥

जग जिंकाया सोपें, परि मन न, सदैव रंगतें विषयीं ।
ज्ञानेशादिक साधु, श्रुति-स्मृती, सांगती मनाविषयीं ॥ १६ ॥

" यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः " सांगे ।
गीता ऐसें ह्मणुनी श्रीयशवंत प्रसाद मी मागें ॥ १७ ॥

---

# पंडित हरि शास्त्री फडके यांचा मृत्यु श्लोक.

ज्यांनीं नेला सतत सगळा काळ विद्यार्जनांत ।
ऐशीं रत्नें विरळ दिसती संप्रती या जनांत ॥

जोडी पाणी विनत असुनी नित्य गीर्वाण-वाणी ।
प्लेगानें या हरुनि फडके नेलि हो, थोर नाणीं ॥ १ ॥

सन्मीमांसोपनिषद तसें कौमुदी–ब्रह्मसूत्र ।
होती माला सुकुसुम, तिचें सांडलें हाय सूत्र ! ॥
विद्या-वृष्टी सरस करिती मेघ सच्छिष्य-भूत ।
गेले ! गेले ! त्यजुनि सगळें काय निःसारभूत ॥ २ ॥

वेदांताची मधुर सरसा वाहिली शुद्ध गंगा ।
अज्ञान्यांतें रमवुनि तिनें दाविलें सच्चिदंगा ॥
पाहूं कोठें जगतिवरती हाय, ! आतां तिला मी ।
प्लेगा, दुष्टा, हरुनि तिजला नेलि कां स्वर्ग-धामीं ! ॥ ३ ॥

जैशी विद्या, सुगुणहि तसे राहती त्यांत सर्व ।
धर्मानें जे असति, न शिवे त्यास हा दुष्ट गर्व ॥
साधी वृत्ती, शम-दम सदा दास होती तयांचे ।
ऐशा रत्ना हरण करण्या प्लेग हा दुष्ट नाचे ॥ ४ ॥

गीर्वाणी ही मुनि-जन-हृदीं जन्मली वाढली, ते— ।
अध्यात्मातें शिकवुनि जनां ईश्वरा दाखवीते ॥
आतां भोक्ते क्वचित दिसती तीस लोकांत पाहे ।
ऐशीं रत्नें हरण करण्या प्लेग हा दुष्ट राहे ॥ ५ ॥

आचार्यांची तशिच मुनिंची योग्यता काय आहे ।
सद्दृष्टीनें हरिसदशही माणसें जाणती हें ॥

' काश्चिन्मां ' हें कथिति भगवान् वाक्य जिष्णूसि पाहे ।
ऐशा रत्ना हरुनि तुजला काय रे, सौख्य आहे ॥ ६ ॥

---

# लो० टिळक समाधीला सुमनांजली.

## आर्या.

योगत्रयांत ज्यांनीं श्रेष्ठ असा कर्म-योग दाखविला ।
आचरिला देहानें सध्दृत्कमलांतरांत साठविला ॥ १ ॥

जनकादिक---नृपति या मार्गानें सत्पदास ते, गेले ।
ठेले विष्णु--पदाला तत्व--ज्ञानांत पूर्ण रंगेले ॥ २ ॥

कारागृह-वास सुखें भोगियला बाल-चित्तग न ढळला ।
वळला कृष्ण-घन पहा, 'स्वराज्य 'फलरूप-वर्ष आदळला ॥ ३ ॥

देशाभिमान--रविनें चेतविली हृदय--मंदिरें सारीं ।
भारत-भू-तिलकाच्या समाधिला आदरें नमस्कारी ॥ ४ ॥

बाळानें तन-मन-धन कष्टवुनी सेविले भरत-देशा ।
वंदावे, सेवावे, गावे त्याच्या गुणास आदेशा ॥ ५ ॥

राष्ट्रासाठीं जावो, राहो, हा प्राण, काळजी नाहीं ।
पाळी स्वनिर्णयाला गा त्याच्या सद्गुणांस तू वाही ॥ ६ ॥

ज्याच्यासाठीं झाली उग्र अशी न्यायदेवता जागी ।
छळिले त्यातें भारी, परि न ढळे धैर्य-मेरु हा जागीं ॥ ७ ॥

कारागृहवास सहा संवत्सर मंडलांत घालविला ।
गीता-मंथन केलें श्रेष्ठ असा कर्म-मार्ग दाखविला ॥ ८ ॥

सप्ताह केसरी हा वाट तुझी पाहतो कधी येशी ।
मार्मिक गोडहि भाषा सुंदर हितकर विचार उपदेशी ॥ ९ ॥

भार्या गेली सुतही त्वच्चित्ताला विकार नच शिवला ।
देहाभिमान गेला, राष्ट्रोन्नति-देवता-पदीं रमला ॥ १० ॥

भारत-भू-बाळ खरा ! इतर तिचे काळ गा, जगीं दिसती ।
उद्धरितो मातेला पुत्राचा अर्थ सत्य दाखविती ॥ ११ ॥

सुमनांजलि अर्पितो मी त्वत्समाधिला आज ।
देवो विभु आत्म्याला सद्गति पद वंदितो अमरराज ॥ १२ ॥

——×——×——

## (३) देवता स्तुति

# निद्रा आणि गोदा.

सृष्टीमध्यें बहुत असती वस्तु आनंददायी ।
निद्रा आहे प्रियतम, तिच्या लागती रोज पायीं ॥
साऱ्या जीवां तिजविण नसे सौख्य प्रत्येक कामीं ।
गोदा आहे तिजहुनी परी श्रेष्ठ या सृष्टि-धामीं ॥ १ ॥

गोदादेवीसम जगिं नसे शुद्ध भूमी जनाला ।
संध्याकाळीं चरण नमितां चित्त जातें लयाला ॥

निद्रेमध्यें प्रतिदिन लया चित्त जातें जनाचें ।
गोदा, निद्रा दिसति सम या, वाटतें हें न साचे ॥ २ ॥

निद्रादेवी जड करुनिया टाकिते स्थूल-काय ।
तीमध्यें हे जन पसरती सोडुनी हातपाय ॥
गोदामाता तनु-मल सदा शोधुनी मोद देते ।
चित्ताचाही मल हरुनिया पाप हें सर्व नेते ॥ ३ ॥

निद्रादेवी विमल न करी चित्त संसार-भक्त ।
नेते तैसे मन फिरुनिया आणिते पापयुक्त ॥
ऐशा तीतें त्यजुनि वरिती साधु गोदावरीतें ।
जी पापाचा लय करितसे, धन्य गोदावरी ते ॥ ४ ॥

गोदादेवी शिव शिरिं धरी, होय कीं शुद्ध फार ।
जी शंभूचें विष शमविते, देइ भक्तांस थार ॥
निद्रेमध्यें वसत असतें बीज अज्ञान-युक्त ।
तूर्या--शंभू त्यजि तिजसि कीं होय संसारमुक्त ॥ ५ ॥

निद्रा शब्दोद्गम निघतसे नासिकांतून, गोदा ।
तैशी देहें प्रथम रमवी नासिक क्षेत्र मोदा ॥
गोदा स्थाना समचि विमल स्थान निद्रा न हो, ती ।
स्थानें, शब्दें जरि सम तरी अर्थ-रूपें न होती ॥ ६ ॥

हृद्देशीं ही वसति करिते कृष्णवर्णा सुषुप्ती ।
जागृत्स्वप्नोद्गम--लय करी, होइना तीस तृप्ती ॥

गोदा-माता धवल-यश ही व्यापिते सर्व लोकां ।
पापाचा कीं करुनि लय दे दिव्य--दृष्टींस लोकां ॥ ७ ।

निद्रेला या सवत नसतां टाकिते कीं पतीला ।
पुत्रां ना हो विभु-सुख, तरी दाखवी स्वात्म-लीला ॥
गोदेला या सवत असतां आवडे हो, पतीला ।
साध्वी आहे पतिशिरिं वसे दाखवी शंभु-लीला ॥ ८ ।

निद्रा माता, परि दश घटी बाळकां भेट देते ।
जागृत्स्वप्ना, त्यजुनि मग त्या भ्रांति-भूमींत नेते ॥
गोदामाता सतत असते भक्त-कामीं उदार ।
भक्ता दावी प्रभुवर, शिरीं घेउनीं पापभार ॥ ९ ॥

गोदा-कांठीं रघुवर करी वास शुद्धा म्हणून ।
योगी येथें तप करुनिया राहिले चित् स्मरून ॥
निद्रेमध्यें वसति करुनी जीव विश्रांति घेतो ।
येतो, जातो सतत करितो कर्म, साहित्य नेतो ॥ १० ॥

ऐशा जीवा सुगति न मिळे माय गोदेविना हो ।
गोदा-देवी-चरण नमिती, जन्म ऐशांस ना हो ॥
'गोदा' 'गोदा' स्मरण करितां पाप जातें लयाला ।
हृद्देशीं या रघुवर वसे, मुक्ति होई जिवाला ॥ ११ ॥

———×———

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ........
ठाणे.

# श्रीगोदास्तुति श्लोक.

नमीं मी सदा माय गोदावरीतें ।
जिच्या दर्शनें चित्त मोदा वरीतें ॥
जिला वंदितां पाप जातें पळून ।
तशा जाति या वासनाही जळून ॥ १ ॥

रघुश्रेष्ठ येथें करी वास, तैसें ।
किती तापसी राहती गुप्त-वेषें ॥
मनीं ध्याउनी सच्चिदानंद राम ।
वसे अंतरीं, जाळिती दुष्ट-काम ॥ २ ॥

जगीं शक्ति मोठी असे शंकराची ।
तिनें आग नेली पहा, तद्विषाची ॥
असे शुभ्र-कांती तिन्ही लोकिं वास ।
तिच्या पाइं हा वंदितो दीन-दास ॥ ३ ॥

जिचें ध्यान होतां करी दास्य मुक्ती ।
रुपें भास जाई उरे मूळ शुक्ती ॥
परी भाव व्हावा खरा अंतरींचा ।
फुका बोल हा व्यर्थ रे, जावयाचा ॥ ४ ॥

मिळो द्रव्य कांता, सदा हीच चिंता ।
तयावीण नाहीं दुजें कार्य चित्ता ॥

असे अंतरीं वासना दांडगी ते ।
पुरेना किती खावया लांडगीतें ! ॥५॥

जिनें खाउनी फस्त केलें जगाला ।
अशी चालवी जन्म संहार-माला ॥
स्वरूपास झांकी स्वमायेंत टाकी ।
तुझ्यावीण गोंदे, तिला कोण हाकी ॥६॥

अहिल्येय तुला बांधिले फार घाट ।
तिनें यापरीं शोधिली स्वर्ग वाट ॥
किती वैश्य तूंतें सदा द्रव्य देती ।
तिन्ही वर्ण हे सेविती भिन्न रीती ॥७॥

इथें छेदिले राक्षसी--कर्ण--नाक ।
असो दुष्ट, त्या दावितो राम नाक ॥
मनीं माजली वासना राक्षसी ते ।
तिला मारि तूं दावि गे, राम--सीते ॥८॥

क्रिया ब्राह्मणाची मला येत नाहीं ।
नसे ठाउके युद्ध हें नांव पाही ॥
तुला द्यावयाला नसे कांहि द्रव्य ।
करा जोडितों घेउनी तूज सव्य ॥९॥

किती जन्म घेऊं किती पाप भोगू ।
किती अंतरीं दुःख, तें काय सांगू

फुगे द्रव्य--मद्यें किती चित्त माझें ।
तया वाटतें मृत्युचें व्यर्थ ओझें ॥ १० ॥

असे देह--पुत्रादि हीं नित्य सारीं ।
तिथे भासतें सौख्य नाना--प्रकारीं ॥
मनीं पुण्य--पापा नसे ठाव कांहीं ।
चिरोनी गळे आणिलें द्रव्य पाहीं ॥ ११ ॥

सदा स्वप्न भासे मिळो द्रव्य--कांता ।
परी दुःख वाटे मनीं फार आतां ॥
तुला जोडितों हात तारी मला गे ।
प्रभूवीण गोदे, न कांहींच मागें ॥ १२ ॥

तुझें स्नान होतां जळे पाप--राशी ।
तुझ्यावीण वाटे नसे थोर काशी ॥
करीं शुद्ध देहा तसे मानसा या ।
असे दीन हा वंदितो दास पाया ॥ १३ ॥

तुझ्या कांठिं संध्या करी ब्रह्मयज्ञ ।
तया ब्राह्मणाला घडे सर्व यज्ञ ।
तसें आत्मरूप स्मरे जीव जेव्हां ।
घडे सिद्धि सायुज्य चित्तांत तेव्हां ॥ १४ ॥

तुझा वायु हा नासिकेंतून जातां ।
हरी कल्मषा, शुद्धता आणि चित्ता ॥

असे हें तरी जो करि प्राणरोध ।
तया कां नसे लौकरी आत्मबोध ॥ १५ ॥

तुझी दिव्य शक्ती असे फार मोठी ।
कथीली मुनींनीं कशी होय खोटी ॥
जगीं अज्ञ--लोकां खरें तें कळेना ।
तरी चित्स्वरूप स्वयें आकळेना ॥ १६ ॥

जरी शीर्ष हें त्र्यंबकाला ह्मणावें ।
न कां नासिका नासिकाला गणावें ॥
तुझी नाभि नांदेड लोकीं प्रसिद्ध ।
नमाया तुला हात जोडून सिद्ध ॥ १७ ॥

तुझी दिव्य-शक्ती असो अंबकाला ।
जिनें शांत केलें पहा, त्र्यंबकाला ॥
कसें शुद्ध केलें तुवां नासिकाला ।
तसें तूं करी शुद्ध मन्नासिकाला ॥ १८ ॥

तुझा माय, दिव्यौघ वाहो मनांत ।
जिवाच्या कला शांत होवोत आंत ॥
हृदीं सांचल्या पाप-राशी अनंत ।
तयांचा करी माय गे, तूंच अंत ॥ १९ ॥

सुषुप्ती करी नाश या कल्पनांचा ।
फिरूनीच येती, असे काय साचा ! ॥

तसा मृत्यु नेतो जिवासी हरोनी ।
परी वासना--बीज राहे मुरोनी ॥ २० ॥

जगीं वृक्ष--बीजें करी वृक्ष मोठे ।
तशी वासना वाढते, काय खोटें ! ॥
फुटे पालवी--रूप हें मूळ--बीज ।
शशी अल्प ही दाविते शुक्र- बीज ॥ २१ ॥

जसा ध्यास होतो तशी वासना ही ।
घडे गे, सदा वाढते, नाश नाहीं ॥
तरी अंतराला करी शुद्ध माते ।
खरें दे जगीं सौख्य गोदे, मला तें ॥ २२ ॥

---

# श्रीपांडुरंग स्तोत्र श्लोक, (अष्टक)

सत्ता तुझीच अवघ्या जगतास देवा ।
जागृत्सुषुप्ति करि-तीं तव पाद--सेवा ॥
ज्ञान--स्वरूप असती हृदयांतरांत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ १ ॥

कांहींतरी पदरीं पूर्वज--पुण्य थोर ।
पाहून कृष्ण--घन नाचति चित्त मोर ॥
एकादशीस तव दर्शन मोक्ष--पंथ ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ २ ॥

श्रीपंढरींत असते लघु--रूप--मूर्ती ।
त्रैलोक्य--रूप दिसतें, कवि हें कथीती ॥
नाहीं विरोध परि जो वसतो मनांत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ३ ॥

निद्रेंत भासति न चित्त--मनादि कांही ।
प्रेरी हरी सतत त्यांस, वसोनि देहीं ॥
आत्मा जया ह्मणती, वास तुझा तयांत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ४ ॥

जीवादि सर्व बुडती अभिमान--डोहीं ।
'माझें' 'तुझें' करिति शून्य--जगत्प्रवाहीं ॥
मातें खरा दिससि विठ्ठल--विश्वनाथ ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ५ ॥

कालाहुनी अससि थोर, नभाहुनीया ।
आखंड तूंच दिससी जगदेकराया ॥
पापी असें ह्मणुनि चित्त न होय शांत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ६ ॥

भक्तास संकट पडे तरि धाव घेशी ।
दामाजिसाठिं विभु--काय महार होशी ॥
सारथ्य पंडु--तनयास तुझें रणांत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ७ ॥

श्रीद्रौपदीस छळिलें जइं कौरवानें ।
आलास धावत कसा प्रभु, तूं त्वरेनें ॥
भक्ती--स्तुति प्रभु तुझी मज नाहि येत ।
श्रीपांडुरंग--चरणीं नमितों अनाथ ॥ ८ ॥

एकादशी--शयनिला स्तव हा करून ।
केलें प्रभो तुजसि अर्पण फूल--पान ॥
जोडोनिया कर नमी तुज दीन--दास ।
श्रीपुंडरीक--वरदे हरि- विठ्ठलास ॥ ९ ॥

## श्रीपांडुरंग स्तोत्र, (अष्टक.)

श्रीविठ्ठला, प्रभुवरा, मज पाव आतां ।
मी ठेवितों तव पदीं अति दीन माथा ॥
कामादि षड्रिपु पहा, मज गांजितात ।
श्रीपांडुरंग--विभु--विठ्ठल माय--तात ॥ १ ॥

जैसा जनास दिसतो प्रभु मंदिरांत ।
पाहे तुका तुज तसा हृदयांतरांत ॥
हो जीव तन्मय शिवांत, वसे अभंग ।
वाणींतुनी निघति कां न खरे अभंग ॥ २ ॥

तूं 'अस्ति' 'भाति' असशी प्रिय--रूप, देवा ।
सांगे श्रुती नच घडे परि नित्य सेवा ॥

मत्पाप आड पडतें विभु-दर्शनाशी ।
देवा, कृपा करि, तयास समूळ नाशी॥ ३ ॥

प्रेमें घडो स्मरण नित्य अनन्यभावें ।
वाचें मनीं तुजसि म्यां प्रभु आळवावें ॥
हीं इंद्रियें प्रभु-पदीं अति लीन व्हावीं ।
पापेंहि संचित, तशीं क्रियामाण जावीं ॥ ४ ॥

या इंद्रियां विषय हा बहु गोड वाटे ।
हो दुःख फार, सुख अल्पहि जन्म आटे ॥
खाणें पिणें प्रतिदिनीं करि एक काम ।
नाहीं हृदीं स्मरण विठ्ठल, राम—नाम॥ ५ ॥

देते सुषुप्ति सुख निर्मल या जनांस ।
ये बीजरूप सगळ्या बघ, इंद्रियांस ॥
जाळी समाधि फल बीज विभु स्मरावा ।
श्रीपांडुरंग हृदयांत सदा भजावा ॥ ६ ॥

येतोस धावत कसा प्रभु, आत्पकाम ।
तूं 'भक्त वत्सल' असें धरितोस नाम ॥
भक्ती मनीं नच अशी घडते न सेवा ।
आलों परी शरण मी तुज देव देवा ॥ ७ ॥

आषाढिच्या शयनिला प्रभु पाद सेवा ।
एकादशीस करुनी दिलि पांडु देवा ॥

राहो प्रभू हृदय मंदिरिं हींच आस ।
श्रीपुंडरीक वरदे हरि विठ्ठलास ॥ ८ ॥

## तूंच समर्थ.

प्रभू मी तुला वंदितों पाद--पद्मीं ।
मला नेइ तूं सर्वदा सौख्य--सद्मीं ॥
अनाथा मला कोण राखी दयाळा ।
पिता, माय तूं सर्व लोकां कृपाळा ॥ १ ॥

तुझी शक्ति मोठी जगा चालवीत्ती ।
तुझें प्रेम मोठें, वसे लोक--चित्तीं ॥
तुझ्या वांचुनीया न कांहींच हाले ।
तुला पाहुनींया मनीं भक्त धाले ॥ २ ॥

मनाचें असे कल्पनेचेंच काम ।
जगीं मात्र आहे तुझें सत्य--धाम ॥
ह्मणोनी मनानें तुला गा, नमावें ।
तुझ्यावीण अन्या न कोणा पहावें ॥ ३ ॥

फिरे बुद्धी चित्तेंद्रियें चक्र देहीं ।
महा--भूत--चक्रां गती तूंच दे ही ॥
असा पिंड--ब्रह्मांड--माया पसारा ।
तुझ्यावीण देई तया कोण थारा ! ॥ ४ ॥

जलानें धरावें नभीं वायु--रूप ।
पुन्हां वर्षुनी सृष्टिला दे स्वरूप ॥
सुषुप्तींत व्हावें मति--ज्ञान--लीन ।
पुन्हां जागृती होय अज्ञान--हीन ॥ ५ ॥

जलाग्नीमधे वैर अत्यंत आहे ।
परी मेघ-पंक्तीमधे वीज पाहे ॥
करी कल्पना स्वप्न नाना-तनूची ।
असे भास तेथें, न सृष्टि प्रभूची ॥ ६ ॥

तुझी शक्ति बा, होय लोकीं अनेक ।
तिला अज्ञ हा जाणतो काय एक ॥
जगाचा असे रक्षिता तूंच देवा ।
म्हणोनी घडावी तुझी एक सेवा ॥ ७ ॥

तुला जाणण्याला न सामर्थ्य मातें ।
म्हणोनी असें लीन देवा पदातें ॥
धनाची, तनूची, कशाचीहि, आशा ।
न येवो, तरी तोड संसार-पाशा ॥ ८ ॥

## श्रीशंकरस्तुति (महाशिवरात्री निमित्त)

### आर्या

श्री सांबा देवा, तूं अससि कुठें हें मला प्रभो सांग ।
तुजवांचुनि दीन अशी चित्तीं खेळे सदा विषय राग ॥ १ ॥

**'शं'** सौख्यं यापरि कवि वदती लोकीं अनेक शद्बार्थ।
परि मम हृदयामाजी अद्यापि ही होइना प्रभो सार्थ ॥ २ ॥

**क**थिला गीतेमध्यें कृष्णांनीं हृदय-मंदिरीं वास।
तव दर्शन मज होवो शिवरात्रीला, अशी असे आस ॥ ३ ॥

**रा**हे चित्तीं विषयाचि, त्याविण न सुचे दुजें मला कांहीं।
अशन-शयनादिकांतें भोगुनिया शांतता मनीं नाहीं ॥ ४ ॥

**ला**व मला **स**न्मार्गीं, दाव तुझें सत्य कोणतें स्थान।
जागृत्स्वप्न-सुषुप्ती भोगीं मी नित्य तेंच हो ध्यान ॥ ५ ॥

**म**च्चित्तीं वास करी तुजवाचुनि अन्य कोण गा मातें।
प्राणायाम ध्यानादिक साधन तें न होय या हातें ॥ ६ ॥

**हा**र-फुलें अर्पुनिया त्वत्पूजा विधि करीतसें भावें।
परि अंतरिं विषय वसे मिथ्यात्मीं चित्त हें सदा धावे ॥ ७ ॥

**शि**वतो अग्नि जयासी खाउनि त्यासी पुढें न तो राहे।
परि मन भोगुनि विषयां श्वानापरि धावतें कसें पाहे ॥ ८ ॥

**व**सुनि गिरि-कंदरांतरिं सन्मुनिनीं या मनासि आकळिलें।
हाकालिले विषयांतें तुज, शोधुनिया मनांत बाळगिलें ॥ ९ ॥

**रा**त्रंदिन केले ते विचार ऐसे अनेक साचार।
शोधिति हृत्कमलीं तुज आधी हा जाळुनी अहंकार ॥ १० ॥

त्रिनयन तुज ह्मणती जन आध्यात्मिक सांग अर्थ हा काय।
शिवशंकर गिरिजावर बाल आह्मी तूंच आमची माय ॥ ११ ॥

सत्य-चिदानंद तुझें रूप कवि सांगती जना पाहे।
परि अज्ञ जन असे मी भव एकाचि आमचा गुरू आहे ॥ १२ ॥

नमुनी तुज साष्टांगें चरणीं मी हीच याचना करितों।
जाळुनि पातक-राशी, हृदयांतरि वास आस ही धरितों ॥ १३ ॥

'मम' 'तव' हा भाव जळो, विषयानें चित्त हें पुन्हां न मळो।
ही भिक्षा मजासि मिळो, जन्म-मरण चक्र गा सदैव टळो ॥ १४ ॥

नरतनु भौतिक ही परि आत्म्याहुनि हो हिची मला गोडी।
खोडी निघतां थोडी कोप चढे, सत्य सर्वदा सोडी ॥ १५ ॥

कष्ट जरी बहु होती तुष्ट तिनें पुष्ट मी करीं तीतें।
नष्ट असे स्पष्ट दिसे, परि अमर-काय नित्य मानीं ते ॥ १६ ॥

रिक्त कसा जाऊं मी मज कांहीं दे तरी प्रभो भाक।
सुखर गुरुवर तूं बा असुरांनां किति असे तुझा धाक ॥ १७॥

तोंवरि मज बा राखी; यम नच आला अजून धावून।
म्हणुनी नमितो तुजला त्वच्चरणीं मस्तकास ठेवून ॥ १८॥

# श्री निवृत्तिनाथस्तवनार्या.

श्रीमन्निवृत्तिनाथा, साधी, मी ठेवितों पदीं माथा ।
भवभयहरणा, त्राता आतां तूं, काम मारितो लाथा ॥ १ ॥

होती लीन पदीं हे संत, तुझ्या, तारि कोण गा, त्यांतें ।
पाहुनि निष्ठा त्यांची, देव न हो कां प्रसन्न गाल्यातें ॥ २ ॥

श्रत्र्यंबकांत वससी तूं एकांत स्थलास पाहून ।
घेऊन शिरीं पातक आलों येथें अनाथ धांवून ॥ ३ ॥

दूर न ढकली मातें. भवाब्धि–नौका तुझ्याविना कोण! ।
तारक, मारक भक्तां ज़रि धरिलासे तुवां गिरीकोण ॥ ४ ॥

देवा, निवृत्तिनाथा प्रवृत्तिनाथास कोण गा तारी! ।
पडलों विषयसमुद्रीं, ग्रासिति कामादि-मकर, त्यां वारी॥५॥

विषयेंद्रिय–संयोगें जें जें मिळतें जनांस अल्प--सुख ।
त्या द्वंद्वांत बुडालों; विठ्ठल–चरणास होउनी विमुख ॥६॥

श्रुति कठ सांगे लोकां "परांचि खानी" जनांस बाह्य मुख ।
धीर--पुरुष आहे जो, वळती त्यांतें करोनि आंत मुख ॥७॥

श्रुतिंत तसा स्मृतिमध्यें सांगितला एक सच्चिदानंद ।
परि तो विचार सारा संस्कृतिं, अज्ञां मिळे न आनंद ॥८॥

ज्ञानेशें जाणुनि हें केली "भावार्थदीपिका" टीका ।
संसार--सुखांधाच्या काढी ती ज्ञान--चक्षुच्या टीका ॥९॥

ज्ञानेश घालि पाया, देउळ करि त्यावरील नाथ--तुका ।
या देवळांत रमतो त्या पुढति बृहस्पतीहि होय मुका ॥१०॥

विठ्ठल--चरणीं झाली ज्याची ती एकनिष्टता भावें।
गातां टाळ--मृदंगीं कां त्या परमेश्वरें न तारावें ! ॥११॥

" अपिचेत्सुदुराचारो ,, इत्यादी वाक्य सांगते गीता ।
करि जो भगवद्भजना, वैश्यस्त्रीच्या निवारि भव शीता ॥१२॥

हा भक्ति--मार्ग शिकविति निवृत्ति नाथादि--संत यां लोकां ।
यवनांच्या कालीं ही झाली उपकृति जनांस आलोका॥ १३॥

पंढरपुरांत रमती विठ्ठल--चरणीं अनेक हे भक्त ।
तरती दर्शन घेतां, जे संसारांत असति हो सक्त ॥१४॥

मुख नामोच्चार करी, कर्ण करी टाळ--नाद तो श्रवण ।
दृष्टी विठ्ठल—पायीं; ऐशीं हीं इंद्रियें तुला शरण ॥१५॥

मग मन काय करी गा, येतें संसार कल्पने मरणा ।
जग हो विठ्ठल सारें " वसुधैवकुटुंबकं " तदाचरण ॥१६॥

संन्यासी पुत्र म्हणुनि छळिती ब्राह्मण तुम्हांस हे फार ।
परि साक्षात् परमेश्वर होता, तरि दाविले चमत्कार ॥१७॥

चालवुनी भिंत तसे, वदविति रेड्यामुखें कसे वेद ! ।
मायेचा खेळ असा, ब्रह्मामध्यें दिसे न तो भेद ॥१८॥

पंडित ब्राह्मण तेव्हां नाथ--तुकाराम--साधुला छळिती ।
वेदार्थ आणिला हा सर्व मराठींत, ही बरी न रिती ॥१९॥

३८८६

सोसुनिया छळ सारा केले लोकीं अनंत उपकार ।
ब्रह्मस्वरूप होउनि भक्तीचें दाविलें जनां सार ॥२०॥
घेउनि अवतार विभो, पवित्र केली जनांत आळंदी ।
क्षेत्र श्रीत्र्यंबक हें रमला येथेंचि सच्चिदानंदी ॥२१॥
वेदांत--विषय अवघड, केला दृष्टांत देउनी सोपा ।
सोपान जो असे गा, मोक्षासी, जाळि वासना--कोपां ॥२२॥
तो संप्रदाय आहे कारण यासी, म्हणोनि किती संत ।
परि भगवद्भजनीं रत, शोधिति हृदयांत इंदिराकांत ॥२३॥
पौषांत वद्यपक्षीं सतैकादशिस भक्तिनें जमती ।
श्रीत्र्यंबकांत रमती निवृत्ति--चरणांत, देव हे गमती ॥२४॥
त्यांसाठीं करुनी स्तव अर्पी संत--चरणांस मी भावें ।
जाळुनि कामादिक रिपु, निवृत्तिच्या कां पदा न लाभावें! ॥२५॥

---

# मुंडकोपनिषद्.

[ पहिल्या भागांत ईश, केन व दुसऱ्या भागांत कठ या तीन उपनिदषांचें रूपांतर वाचकांपुढें आलें आहे. या तिसऱ्या भागांत मुंडकोपनिषद् दिलें आहे. पूर्वीप्रमाणें सामान्य अर्थ आणण्याचा प्रयत्न केला आहे. ]

ब्रह्मा असे हो, पहिला जगांत ।
कर्ता तया, रक्षक जीव--जात ।

विद्या दिली ज्येष्ठ मुलास मूळ ।
आहे पहा, सर्व जगास मूळ ॥ १ ॥

तो सांगतो आंगिरसास सारी ।
तो सत्यवाहास कथी, विचारी ।
एणेंपरी आंगिरसास सांगे ।
विद्या अशी गा, जगतांत वागे ॥ २ ॥

आला असे शौनक तो विधीनें ।
सांगे मला आंगिरसा, सुधीनें ।
**शौनकः—** जी जाणतां सर्व कळे मनाला ।
विद्या अशी दे मज बालकाला ॥ ३ ॥

**आंगिराः—** विद्या दिसे दोन जगांत जाण ।
बोले तया, होय जुनें प्रमाण ।
एका 'परा' हो 'अपरा' द्वितीया ।
ज्ञाते अशा जाणती, सांगती या ॥ ४ ॥

वेदादि, शिक्षा, इतिहास, छंद ।
शास्त्रें, कथा, व्याकरणादि नाद ।
जाणे परा तत्त्व कथी जनाला ।
विद्या अशा जाण पराऽपराला ॥ ५ ॥

न ग्राह्य, न श्रोत्र, न चक्षु पाही ।
बुद्धीस त्याचें कळतें न कांहीं ।

सर्वांमधे व्यापक चित्स्वरूप ।
पाहे तया वीर परात्म-रूप ॥ ६ ॥

ज्याला नसे पार, अपार कांहीं ।
न न्यून, मोठा दिसतो न पाहीं ।
ज्यानें जगाला परिपूर्ण केलें ।
वृक्षाप्रमाणें स्थिर, दिव्य ठेलें ॥ ७ ॥

कोळी करी जाल तनु-प्रसार ।
ग्रासी पुन्हा, भूमि तरूंस थार ।
देहांतुनी केस, नखें निघालीं ।
त्या अक्षरांतून नभादि आलीं ॥ ८ ॥

ज्ञानस्वरूप्यक्षर वाढतां हें ।
भोक्ता, तसें भोग्य बनून राहे ।
प्राणादि कार्यें, निघतात लोक ।
तेथून सारे हृदयीं विलोक ॥ ९ ॥

ज्ञाता असे सर्व जगास रूप ।
वेत्ता तसा होय तपःस्वरूप ।
नामाकृतीनें नटला जगांत ।
भोक्ता तसा भोग्य चिदंतरांत ॥ १० ॥

---

[ प्रथम खंड समाप्त. ]

## द्वितीय खंड.

तें हें असे सत्य विकार-जात ।
मंत्रांत कर्मे ऋषि पाहतात ।
त्रेतायुगीं जीं बहुधा जहालीं ।
तीं आचरावीं सुर-मार्ग झाली ॥ १ ॥

ज्वाला निघे अग्निस चेतवीतां ।
द्या आहुतीला घृत-मिश्र होता ।
आहे असा मार्ग कवी जनांचा ।
तो आदरावा मुनिची सुवाचा ॥ २ ॥

श्रद्धा नसे ज्या पुरुषास कांहीं ।
जो वैश्वदेवा न धान्य वाही ।
अग्नीस होमी नच जो कदापी ।
लोकांस सातां मिळतो न पापी ॥ ३ ॥

काली[१] कराली[२] सुमनोजवा[३] गा ।
स्फुलिंगिनी[४] विश्वरुची[५] सुवेगा ।
ती धूम्रवर्णा[६], तशि लोहितांगा[७] ।
या सप्त-जिव्हा कथि अग्नि भागा ॥ ४ ॥

ज्वाला अशा पेटवी तेजयुक्त ।
दे आहुती त्यांवर मंत्रसूक्त ।

या आहुती बा, रात्रि रश्मि होती ।
होत्यास देव-स्थल दाखवीती ॥ ५ ॥

ये, ये, ह्मणोनी वर बोलवीती ।
तेजः स्वरूपें सुकृतांत नेती ।
वाणी तयासी मधु बोलतात ।
सृष्टि-प्रकारा मुनि सांगतात ॥ ६ ॥

हें श्रेष्ट नाहीं परी कर्म जाण ।
नाशास जातें, न सुख-प्रमाण ।
तें पूर्ण लोकीं म्हणतात मूढ ।
जन्मास येती, कळतें न गूढ ॥ ७ ॥

हे आपणा पंडित मानितात ।
धीर--स्वरूपी तरि जाणतात ।
कामादिकांना वश होती सारे । - -
अंधासवे अंध जसे चला, रे ॥ ८ ॥

अज्ञान-पंकीं बुडतात भारी ।
'स्वयं कृतार्थ' भ्रम त्यां न वारी ।
रागामुळें ते विषयांत सक्त ।
येतात जन्मास जगांत रक्त ॥ ९ ॥

यज्ञादि, दानें ह्मणतात मोठीं ।
त्याहून कांहीं निघतें न ओठीं ।

स्वर्गांत सौख्यें सरतां विकारी ।
ये मृत्यु-लोकांत, न ते विचारी ॥ १० ॥

श्रद्धा-तपानें मन शांत व्हावें ।
भिक्षान्न खावें, वनवास घ्यावें ।
तेजःस्वरूपी रवि-मंडळांत ।
ध्यानें असे तो चिदात्म, शांत ॥ ११ ॥

वैराग्य यावें करुनी विचार ।
कार्यें जगाची असती असार ।
शोधी गुरू स्वानुभवी वियोगी ।
संसार-सौख्यांत रते अभागी ॥ १२ ॥

ज्याची मती शांत, सुशांत झाली ।
आत्म-स्वरूपी हृदयांत धाली ।
त्यातें कथावें विभुचें स्वरूप ।
व्यापी जगातें सत्य चिदात्मरूप ॥ १३ ॥

---

(प्रथम मुंडक द्वितीय खंड)

तें सत्य जाणे, ठिणग्या निघाव्या ।
अग्नींतुनी चेतवितां वहाव्या ।
तेणेंपरी चिज्जड होय सारें ।
उत्पन्न; जाती द्विविधा पसारे ॥ १ ॥

न प्राण, ज्या चित्त न शुभ्र आहे ।
दिव्याज मूर्ती नसते तया हे ।
बाहेर नाहीं, वसतें न आंत ।
ते अक्षराहून परापरांत ॥ २ ॥

त्यापासुनी प्राण मतींद्रियें तीं ।
आकाश वाय्वग्नि, धराप येती ।
भूतादि सृष्टी सगळी निघाली ।
देहेंद्रियें हीं परिपूर्ण झालीं ॥ ३ ॥

अग्नीस या शीर्ष, दिशांस कान ।
सूर्येंदुला नेत्र-समान मान ।
हो प्राण वायूस धरेस पाय ।
हा सर्व भूतांतर होय काय ॥ ४ ॥

हा लोक वन्ही समिधा रवी हो ।
पर्जन्य सोम क्षिति धान्य वाहो ।
पुंसांमधे रेत धरील वास ।
त्यापासुनी सर्व जगा निवास ॥ ५ ॥

वेदादि, दीक्षा यजमान, लोक ।
संवत्सरादी, रवि हे विलोक ।
उद्भिज्ज-कोटी सगळी निघाली ।
आत्मस्वरूपांतुनि सर्व आली ॥ ६ ॥

देवा, मनुष्या स्थल हेंच होय ।
पक्षी पशू सार्द्रभूतींत धाय ।
प्राणादि धान्यादिक सर्व यांत ।
श्रद्धा-तपें हीं सगळीं अनंत ॥ ७ ॥

प्राणादिकांनां स्थल पूर्ण आहे ।
सप्तार्चि-जिव्हा समिधास वाहे ।
हे सप्त गा, लोक तिथे रहाती ।
प्राणादि तेजो-हृदयीं वहाती ॥ ८ ॥

ठाणें समुद्रादिक–पर्वताला ।
साऱ्या नद्या वाहति सच्चिदाला ।
सर्वौषधी घे रस याच ठाई ।
येणें परी सर्व विभूस गाई ॥ ९ ॥

हें विश्व आहे परमात्मरूप ।
कर्मे, तपें जाण विभु–स्वरूप ।
हृद्यंततेजः पुरुषांतरात्मा ।
ॐ सच्चिदानंद–विभू चिदात्मा ॥ १० ॥

---

[ द्वि. मु. प्र. खंड. ]

सृष्टीमधे ब्रह्म ( सत्य ) असे वरिष्ट ।
बुद्धींद्रियादी दिसती कनिष्ट ।

हृज्ज्योति हें हालवि विश्व सारे ।
जाणे तिला, हे त्यजुनी पसारे ॥१॥

हृत्तेज हें सूक्ष्म असे अणूंत ।
लोकांतराला धरि याच भूत ।
सत्यामृता जाणसि वाङ्मनानें ।
ब्रह्माक्षराला हृदयांतरा ने ॥ २ ॥

ॐकार ध्यावा धनू वाक्स्वरूप ।
ध्यावा चिदात्मा शर भक्तिरूप ।
ब्रह्मात्म हें ध्येय असे जिवाचें ।
गा सच्चिदानंद रसाळ वाचें ॥ ३ ॥

ॐ कार ध्यावा धनु हें करांत
जीवा ह्मणावें शर तन्मयांत
एकाग्र–चितीं वरि ही शिकार ।
वैराग्य यावें त्यजितां विकार ॥ ४ ॥

द्यौ व्यापकाकाश--धरा--मनाला ।
प्राणादिकाला, स्मर सच्चिदाला ।
त्यावाचुनी नान्य कदा भजावें ।
वाणींतुनी त्याविण नान्य गावें ॥ ५ ॥

नाभींत सारे बसतात आर ।
नाड्या हृदीं ग्रंथि करी पसारे ।

ॐ कार-रूपास सदा स्मरावें ।
कल्याण व्हावें तरि त्यास गावें ॥ ६ ॥

जो सर्व-वेत्ता महिमा जगांत ।
प्राणादि नेता हृदयांत शांत ।
तज्ज्ञान योगें विभुला पहावें ।
ॐ सच्चिदानंद मनीं स्मरावें ॥ ७ ॥

हृद्वासना-ग्रंथिस सोडवावें ।
तत्संशयाला त्यजुनी रहावें ।
कर्मे अशीं क्षीण हृदीं करावीं ।
ॐ सच्चिदानंद विभूति गावी ॥ ८ ॥

नहीं कला, राग, नसे प्रकाश ।
ज्योतींस तज्ज्योति, हिरण्यपाश ।
हो शुभ्र, जाणे कवि त्यास चित्तीं ।
ॐ सच्चिदानंद-परेश चिंती ॥ ९ ॥

त्याच्या प्रकाशांत जगत्प्रकाशे ।
त्याला कसा चंद्र, रवि प्रकाशे ।
विद्युन्न त्यातें करिते प्रकाश ।
त्याच्या प्रकाशें जगता विकाश ॥ १० ॥

पूर्वेस पश्चाद्दिकसे सदैव ।
खाली, वरी, दक्षिण सर्व देव ।

हें विश्व सारें प्रकटे तयानें ।
ॐ सच्चिदानंद विभूस त्या ने ॥ ११ ॥

---

द्वितीय मुंडक द्वितीय खंड.

पक्षी सखे दोन समान होते ।
एकाच वृक्षावरती रहाते ।
खाइ फळें एक रसें सुवासी ।
भोगी न कांहीं दुसरा उदासी ॥ १ ॥

ऐशा दुजाला हृदयांत जाणें ।
सर्वत्र वस्ती हृदिं पूर्ण ठाणें ।
मोठेपणा सर्व जगांत आहे ।
टाकून शोका परमात्म पाहे ॥ २ ॥

सोन्यासमानेश दिसे मनांत ।
कर्ता, तसा कारण होय शांत ।
टाकून पापास, निरंजनास– ।
ध्याई समाधींत पर–प्रकाश ॥ ३ ॥

प्राण–स्वरूपी कृति–रूप घेई ।
बोले न विद्वान् रति–कार्य येई ।
प्रेमात्मरूपी रमतो वरिष्ट ।
हो सच्चिदानंद, नसे अरिष्ट ॥ ४ ॥

सत्यें मिळे तो, तप ज्यास गांठी ।
ज्ञानें वळे जो, हृदयांत गांठी ।
अंतः शरीरांत वसे अखंड ।
पाहे यती वृत्तिमधें, न खंड ॥ ५ ॥

सत्यामुळें हो जय, नानृतानें ।
सत्यामुळें मार्ग सुखासना नें ।
गेले ऋषी होउनि आत्पकाम ।
ॐ सच्चिदानंद हृदीं विराम ॥ ६ ॥

मोठें, तसें दिव्य, न चिंत्य-रूप ।
सूक्ष्माहुनी सूक्ष्म, चिदाख्यरूप ।
हो दूर, तैसे जवळी पहावें ।
हृन्मंदिरीं सच्चिदनंत व्हावे ॥ ७ ॥

डोळे न ज्या पाहती, वाक् वदेना ।
कर्में, तपें, अन्यहि जाणते ना ।
ज्ञान--प्रसादीं रत नित्य व्हावें ।
ॐ सच्चिदानंद- पदा नमावें ॥ ८ ॥

आत्मा असे हा लघु, बुद्धि जाणे ।
हो पंचधा प्राण मनांत वाणे !
व्यापी जगाला; असतो विशुद्ध ।
ॐ सच्चिदानंद मतींत बुद्ध ॥ ९ ॥

[stamp]

जें जें यती इच्छितसे मनांत ।
सत्वें वसे चिन्मय-मंदिरांत ।
तें तें मिळे त्यांस उणें न कांहीं ।
ॐ सच्चिदानंद मतींत पाही ॥ १० ॥

—o—

तृतीय मुं. प्र. खं.

तो जाणतो ब्रह्म परमात्मधाम ।
हें विश्व भासे स्थिर, शुभ्र नाम ।
निष्काम त्यातें भजतात वीर ।
शुद्ध--स्वरूपी रमतात धीर ॥ १ ॥

इच्छा जगाची हृदयांत होते ।
सृष्टि-क्रमानें फल सिद्ध हो, तें ।
पर्याप्त-कामी असतो निरिच्छ ।
ही सृष्टि भासे हृदयांत तुच्छ ॥ २ ॥

पांडित्य केव्हां मिळवी न त्यातें ।
मेधा, तसे ग्रंथ न जाणती तें ।
जो होय हृज्योति समाधि--रूप ।
ॐ सच्चिदानंद भजे स्वरूप ॥ ३ ॥

आत्मा मिळेना बलहीन लोका ।
मोहामुळें लिंग-विहीन जो कां ।

ज्ञानें तपानें हृदयीं भजावा ।
ॐ सच्चिदानंद-मति स्मरावा ॥ ४ ॥

ज्ञानांत तृप्ती मिळते मुनीला ।
वैराग्य, शांती दिसतात लीला ।
सारें मिळे त्या, हृदयांत धीर ।
ॐ सच्चिदानंद भजेल वीर ॥ ५ ॥

वेदांत---विज्ञान---सुनिश्चितात्मा ।
सन्यास--योगी रमतो चिदात्मा ।
ये मोक्ष मृत्यू--समयीं--तयाला ।
ॐ सच्चिदानंद--पदीं निमाला ॥६॥

गेल्या कला पंचदशेंद्रियादी ।
देवांत गेले तनु-तेज सादी ।
विज्ञान--कार्ये हृदयीं निवालीं ।
ॐ सच्चिदानंद--पदीं विरालीं ॥ ७ ॥

जाती नद्या अब्धित, एक होती, ।
नामें न रूपें दिसतात अंतीं ।
विद्वान् त्यजी हें जग नाम--रूप ।
ॐ सच्चिदानंद भजे स्वरूप ॥ ८ ॥

जो जाणतो ब्रम्ह परेश चित्तीं ।
तद्रूप होतो, इतरां न चिंती ।

शोकास टाकी, परमात्म हो तो ।
ॐ सच्चिदानंद विभुत्व घेतो ॥ ९ ॥

श्रद्धा मनीं, कर्म करी नितांत ।
शास्त्रज्ञ वन्हीं उपासितात ।
त्यांना कथावें, व्रत ज्यास आहे ।
ॐ सच्चिदानंद–विभूस पाहे ॥ १० ॥

ऋग्वेद सांगे जगतास याला ।
हें सत्य बोले मुनि आंगिराला ।
नेणें व्रताला कथ, त्या न याला ।
ॐ सच्चिदानंद नमीं पदाला ॥ ११ ॥

---

# शिवाजी स्फूर्ति श्लोक.

यत्पुण्यराशिरभवाच्छिवराजनामा ।
यस्य प्रभावसविता क्रमते दिगंतम् ॥
गागाभट्ट

Shivaji taught modern Hindus to rise to the full stature of their Grouth

**Judunath Sarkar.**

शिवादेवी-तेजः स्फुरण शिवनेरी उगवला ।
जिजाईच्या पोटीं; यवन-करिला सिंह गमला ॥
गिरी सह्याचें हें मजसि दिसतें तेज अतुल ।
मराठेशाहीचें सरस-बल साम्राज्य विपुल ॥ १ ॥

जिजाई, दादोजी शिवमतिस संस्कार करिती ।
विपत्कालीं सांगे भरत-कुल-रामायण रिती ॥
तुकारामीं, रामीं, जन-सुखद-कामीं विरमला ।
शिवादेवी-शक्ति-ध्वज भरतखंडी फडकला ॥ २ ॥

चिमाजी-आपानें समर करुनी तेज हरिलें ।
फिरंग्यांचें, घेई वसइ अतुल-प्रेम वरिलें ॥
महाराष्ट्राचें या करिति सगळें नाम करण ।
शिवाजीचें तेजःस्फुरण करितें शत्रु-दमन ॥ ३ ॥

शिवाजीनें केलें हवन चमुचें मोंगल करीं ।
स्वयें अध्वर्यू गा, समर "[1] वन दिंडोरीनगरी" ॥
महाराष्ट्रीं ऐसा ध्वज फडकला बाल--रविचा ।
पहा, व्यापी सारे भरत किरणें स्नेह कविचा ॥ ४ ॥

रघोजीच्या तेजें हृदय उललें वंग--भुवनीं ।
जयातें पाहोनी यवन हृदयीं गुंगति वनीं ॥

---

१ कार्तिक शुक्ल १४ [ ता. १७ आक १६७० ]

While returning from Surat, Shivaji fought with Daudkhan near Dindori and captured one elephant. Shivaji then went to कुंजगड, aud stayed there मार्गशीर्ष Shivaji went to करंजा while going he captured अहिवंत, रावळा जावळा, मार्कंडेय किल्ला.

जेधे शकावली.

नमी कालीकेला शिव-नृपति-तेज प्रकटलें ।
पहा, स्वातंत्र्याचें सुरस-लतिका पुष्प फुललें ॥ ५ ॥

"पुण्याची पुण्याई भरत हृदयीं न्या झडकरी।"
महादाजी शिंदे म्हणत असती; द्वंद्व न करी ॥
परंतु राज्याचा शकट धरि नाना न गाणितो ।
अशा द्वंद्वानें गा, रिपु-हृदय-पाशांत गडतो ॥ ६ ॥

शिवाजीचा तेजध्वज फडकला सिंधु--लहरीं ।
मराठे-शाहीचा विजय चढला मेरु-शिखरीं ॥
करें राघोबाच्या अरि-रुधिर पीऊन रुतला ।
स्वराज्याचा ऐसा सरस-कलिका-गुच्छ फुलला ॥ ७ ॥

निघे सह्याद्रीचा शिव-नृपति-गंगौघ-धवल ।
मिळे सिंधूला तो अटकजवळी, कीर्ति-कमल ॥
फुले, गंधें कोंदे भरत हृदयीं वंग---भुवनीं ।
विदर्भी सौराष्ट्रीं, मरु--वरुण, कर्नाट-कवनीं ॥ ८ ॥

पराच्या सत्तेने हत-बल वने वीर समयीं ।
स्वराज्याची त्यातें कधि न दिसते आस हृदयीं ॥
मुळें--पाळें गेलीं सकल तुटुनी हिंद--तरुची ।
अशा वेळीं देतें शिव-शिखर--गंगोदक रुची ॥ ९ ॥

———×———

३eeb.



REFBK-0003988
REFBK-0003988

# पद्यपुष्पहार भाग २ वरील अभिप्राय.

१ महाराष्ट्र साहित्य पत्रिका, मुंबई जानेवारी १९२९
एकंदरींत जोशी यांच्या कविता सोज्वल दिसतात.

२ महाराष्ट्र–नागपूर ता. १६ डिसेंबर १९२८
कवितांची रचना प्रौढ, शुद्ध व सुश्लिष्ट आहे. कविता सरस असून उपनिषदांतील विचार सुंदर रीतीनें ग्रथित केले आहेत.

हा पद्यपुष्पहार मुंबई सरकारनें लायब्ररी पुस्तक ह्मणून मंजूर केला आहे.

पत्ताः—**गजानन गोपाळ जोशी,**
पेन्शनर स्कूलमास्तर, राजेबहाद्दर गल्ली
घर नं. १०६४ नाशिक शहर.